cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-३६ | शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### कर्मचाऱ्यांचा संताप अन् शासनाची उदासीनता...!

राज्यातील तब्बल १७ लाख शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप हा केवळ प्रशासनाविरुद्धचा रोष नसून शासनाच्या दीर्घकाळ चाललेल्या उदासीनतेवर उमटलेला तीव्र निषेध आहे. या संपामुळे राज्यातील दैनंदिन शासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत असून, सामान्य नागरिकांना त्याचा थेट फटका बसत आहे. मंत्रालयापासून ते जिल्हा पातळीवरील कार्यालये, शाळा, रुग्णालये या सर्वच यंत्रणा विस्कळीत होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# शेतकरी सक्षमीकरणासाठी राज्याची नवी दिशा...!

## राज्यपालांसमोर कृषी धोरणांवर मॅरेथॉन चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांपुढील विविध आव्हाने, त्यावर उपाययोजना आणि भविष्यातील कृषी नियोजन या विषयांवर राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी राज्यपालांसमोर लोकभवन येथे सविस्तर सादरीकरण केले. तब्बल तीन तास चाललेल्या या बैठकीत शेतकरी आत्महत्या रोखणे, काढणीनंतरची (पोस्ट-हार्वेस्ट) व्यवस्था मजबूत करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.**



या बैठकीला राज्यपालांचे सचिव, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू तसेच कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सादरीकरणादरम्यान विविध धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होऊन काही महत्त्वपूर्ण निर्णयांची दिशा निश्चित करण्यात आली. शेतकरी आत्महत्या हा राज्यासमोरील अत्यंत गंभीर प्रश्न असल्याचे नमूद करत, तो केवळ आर्थिक नसून सामाजिक पैलूंशीही निगडित असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर 'मॉडेल व्हिलेज' (आदर्श गाव) संकल्पना राबवण्यावर आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण करण्यावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील सुमारे २ कोटी शेतकरी कुटुंबांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी 'महा-विस्तार' ▶▶ पान २ वर

# कारागृहातील व्हायरल क्लिप नियोजित डाव :पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा कारागृहातून काल एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. या क्लिपमध्ये काही गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले होते. त्यात कथितपणे एका व्यक्तीवर गोळीबार करण्याचा कट आणि इतर बेकायदेशीर कृत्यांबाबत उल्लेख होता. मात्र आज त्याच प्रकरणाशी संबंधित दुसरी एक ऑडिओ क्लिप समोर आली ज्यात आधीची क्लिप ही दबाव टाकून बनवली गेली याबाबत सविस्तर लेखी खुलासा संबंधित बंदी कैद्याने केला आहे म्हणजे हा सर्व प्रकार पूर्वनियोजित असल्याचे दिसून येत आहेत.**



बीड जिल्ह्यामध्ये नेमकं चाललय तरी काय असा प्रश्न बाहेर जिल्ह्यातील लोक सहज विचारून जातात घटनाही तशाच घडत आहे जिल्हा कारागृहामध्ये बंदी असलेल्या एका कायद्याने काल कारागृहातून सुटलेल्या एका व्यक्तीबरोबर फोनवर चर्चा केली त्यात अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप केले माझ्यावर विनाकारण संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींनी हल्ला केला याबरोबरच कारागृहातील पोलिसावर ही संशय व्यक्त केला या संभाषणाची ऑडिओ क्लिप ▶▶ पान २ वर

# उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचा चेहरा-सपकाळ



मुंबई । प्रतिनिधी

विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक पार पडणार आहे. तर एका जागेसाठी पोटनिवडणूक पार पडणार आहे. काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांनी आपल्या विधान परिषदेच्या जागेचा राजीनामा दिला होता. ९ जागांची निवडणूक आणि एका जागेची पोटनिवडणूक या दोन्ही निवडणुकांसाठी एकाच दिवशी १२ मे रोजी मतदान होणार आहे.अश्यात उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचा चेहरा असतील मत हर्षवर्धन सपकाळ पक्षीय बलाबल पाहता विधान परिषदेच्या १० जागांच्या या निवडणुकीत महाविकास ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### नाशिकमध्ये आणखी एका भोंदूचे कांड

नाशिक : येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात रोज नवनवीन हादरवून टाकणारे खुलासे होत आहेत. हे प्रकरण ताजे असतानाच नाशिकमध्ये आणखी एका भोंदूबाबाचे प्रकरण समोर आले आहे. या भोंदूबाबाने महिलेला जाळ्यात अडकवून विधी करण्याच्या नावाखाली तिला लॉजवर नेले. त्याठिकाणी त्याने महिलेवर बलात्कार केला. या घटनेमुळे नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.नाशिकच्या लासलगावमध्ये आणखी एका भोंदूविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा त्याच्याविरोधात आरोप आहे. महेश गिरी असे या भोंदूबाबाचे नाव असून त्याच्याविरोधात जादूटोणाविरोधी कायदा आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिकच्या निफाड तालुक्यातील धरणगाव खडकमध्ये या भोंदूबाबाचा मठ आहे. हा मठ प्रति गाणगापूर मठ म्हणून प्रसिद्ध आहे.

### नांदेडमध्ये भीषण अपघातात ४ ठार

नांदेड : राज्यात अपघातांची मालिका सुरूच आहे. उन्हाळी सुट्यांमुळे विविध जिल्ह्यांत रस्त्यावर वाहनांची ये-जा वाढली आहे. या वाहतुकीदरम्यान अपघातही वाढले आहेत. नांदेडमध्येही भीषण अपघाताची घटना घडली आहे. नांदेडच्या हडसनी फाट्याजवळ बुधवारी रात्री भरधाव कारने दोन दुचाकींना धडक दिली. या अपघातात चार जणांचा जागीच अपघाती मृत्यू झाला आहे.नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील हडसनी फाट्याजवळ बुधवारी रात्री दहा वाजता ही दुर्घटना घडली. दोन दुचाकी आणि कारमध्ये झालेल्या अपघातात चार जण ठार झाले. तर दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातात दुचाकीवरील आई, मुलगा आणि आत्या असे तिघे जण ठार झाले. तर दुस-या कुटुंबातील एक जण ठार झाला.

### अमेरिकेचे नौदल प्रमुख बडतर्फ

वॉशिंग्टन डीसी : अमेरिकेत संरक्षण मंत्रालयाच्या (पेंटागॉन) आत सातत्याने मोठे निर्णय घेतले जात आहेत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी आर्मी चीफ रँडी जॉर्ज यांना हटवले होते. आता नौदल प्रमुख जॉन फेलन यांनाही पदावरून बडतर्फ केले आहे.यासोबतच, अणु विभागाशी संबंधित एक वरिष्ठ अधिकारी अँड्र्यू हग यांना संवेदनशील माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले आहे, जे कथितरित्या हनी ट्रॅपमध्ये अडकले होते. ही संपूर्ण घटना अशा वेळी समोर आली आहे, जेव्हा अमेरिका इराणसोबत युद्धात गुंतले आहे. पर्शियन गल्फमध्ये (फारसच्या आखातात) अमेरिकन नौदल सक्रिय आहे. संरक्षण मंत्र्यांशी समन्वय साधू शकले नाहीत. पेंटागॉनने एक छोटे निवेदन जारी करून ही माहिती दिली, परंतु त्यांना हटवण्याचे स्पष्ट कारण सांगितले नाही.

# केजरीवालांचे न्यायालयीन कामकाजाचे व्हीडीओ हटवा

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**दिल्ली उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत व्हीडीओ रेकॉर्डिंग सोशल मीडियावरून तातडीने हटवण्याचे आदेश दिले आहेत. हे व्हीडीओ केजरीवाल यांनी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्यासमोर स्वत: बाजू मांडली होती तेव्हाचे आहेत.**

मद्य धोरण प्रकरणात अटकेत असलेल्या अरविंद केजरीवाल यांना जेव्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते, तेव्हा त्यांनी स्वत: न्यायाधीशांसमोर युक्तिवाद केला होता. नियमानुसार, न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत चित्रीकरण किंवा प्रसारण करण्यास मनाई असते. मात्र, या सुनावणीचे व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते. या प्रकरणी न्यायालयाने केवळ व्हीडीओ हटवण्याचे आदेश दिले नाहीत, तर नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कठोर भूमिका घेतली आहे. न्यायालयाने खालील व्यक्ती आणि प्लॅटफॉर्म्सना नोटिसा बजावल्या ▶▶ पान २ वर

# जगावर इतिहासातील सर्वात मोठे ऊर्जा संकट



न्यूयॉर्क । वृत्तसंस्था

**इराण युद्धाच्या परिणामांमुळे जागतिक ऊर्जा सुरक्षा धोक्यात आली आहे. दररोज १३ दशलक्ष बॅरल तेलाचा पुरवठा ठप्प झाला असून वाढत्या किमतींमुळे इंधनाच्या मागणीवर मोठा ताण येईल आणि यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसू शकतो, असा इशारा आयईएचे प्रमुख फातिह बिरोल यांनी दिला आहे.**

अमेरिका आणि इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यास नकार दिल्याने गुरुवारी कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी झेप घेतली आहे. इराणने स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत अमेरिकन नौदलाची नाकेबंदी सुरू आहे, तोपर्यंत हा जलमार्ग बंदच राहील. यामुळे ब्रेंट क्रूड ३.६२% वाढीसह १०५.६३ डॉलर्स प्रति बॅरलवर पोहोचले. तर डब्ल्यूटीआय क्रूड ४.०६% ▶▶ पान २ वर

# नोकरी जाण्याच्या भीतीने दरवर्षी ८ लाख मृत्यू

जीनिव्हा/नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राहणीमान सुधारणे, कुटुंबाला आधार देणे आणि आत्मनिर्भरता जपणे यासाठी नोकरी पर्याय असते. याच पर्यायासाठी बहुतांश लोक अनेक शहरांतून कन्फर्ट सोडून दुस-या शहरांकडे वळतात. परंतु तीच नोकरी, टॉक्सिक वर्क कल्चर जेव्हा जीवघेणी ठरते तेव्हा चिंता वाढते. जीनिव्हा जागतिक कामगार संघटनेकडून समोर आलेले नवीन आकडे धक्कादायक आहेत. दरवर्षी ८ लाख ४० हजाराहून अधिक लोक टॉक्सिक वर्क कल्चरमुळे मृत्यूमुखी पडत असल्याचं रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.



लोकांना कामाशी निगडित चिंता, अधिक वेळ कामाला वेळ देणे, नोकरी जाण्याची चिंता सतावणे या सर्व गोष्टींमुळे साइकोसोशल रिस्क जन्माला येते. त्यामुळेच लोक हार्ट आणि ब्रेनशी निगडित समस्यांचा सामना करत आहेत. काही प्रकरणात मानसिक दबावामुळे कर्मचारी टोकाचे पाऊल उचलत आहेत. या आजारामुळे अकाली मृत्यू पावणा-या लोकांची संख्या समोर येते, ज्यामुळे दरवर्षी जागतिक जीडीपीच्या १.३७ टक्के इतके अंदाजित आर्थिक नुकसान होते. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास हा रिपोर्ट कामाच्या ठिकाणी असलेल्या मानसिक वातावरणाचे परीक्षण करतो. सर्वात पहिले कर्मचा-यांना त्यांची उद्दिष्टये साध्य करण्यास मदत व्हावी यासाठी कामाचे वातावरण कसे तयार केले जाते आणि त्याचे व्यवस्थापन कसे केले जाते हे पाहिले जाते.दुसरा आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्यालयाचे वातावरण, ▶▶ पान २ वर

## नवीन गॅस कनेक्शनला अंशत: स्थगिती

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जेव्हापासून मध्य पूर्व आशियात युद्धाचा भडका उडला आहे तेव्हापासून भारतात एलपीजी गॅसचा पुरवठ्याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. आता गॅस सिलिंडर बुकिंगसाठी २५ दिवसांची वाट पहावी लागत आहे. ग्रामीण भागात तर हा प्रतीक्षेचा काळ ४५ दिवसांवर पोहचला आहे. दरम्यान बीपीसीएल या कंपनीने सांगितले की भूराजकीय परिस्थिती पाहता नवीन एलपीजी गॅस कनेक्शन देणे काही काळासाठी बंद केलेले आहे. सध्या वितरक हे गॅस रिफ्युअलिंगवरच जास्त भर देत आहेत. ▶▶ पान २ वर

# इराणचा नवा डाव, इंटरनेट केबल निशाण्यावर?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळं सुरुवातीला एलपीजी पुरवठा ठप्प झाला होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण सोबतची शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी सुरु ठेवली जाणार असल्याचं म्हटलंय. मात्र, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी झालेला नाही. याशिवाय अमेरिका आणि इराण यांच्यात दुसऱ्या फेरीची शांतता चर्चा कधी होणार हे देखील



स्पष्ट झालेलं नाही. अमेरिकेनं होर्मुझची सामुद्रधुनी अडवून धरली आहे. यामुळं इराणकडून देखील नवी खेळी करण्यात आली आहे. इराणच्या आयआरजीसीकडून आता होर्मुझच्या सामुद्रधुनीत असलेल्या इंटरनेट केबलला टार्गेट केलं जाऊ शकतं. इराणकडून समुद्रातील इंटरनेट केबलचं नुकसान करण्यात आल्यास भारतासह काही देशांमध्ये इंटरनेट ठप्प होऊ शकतं.

मीडिया रिपोर्टनुसार, होर्मुझची सामुद्रधुनी आणि लाल समुद्रात ऑप्टिकल फायबर केबलचं जाळं आहे. या केबलमधून बहुतांश देशांमध्ये इंटरनेट पोहोचतं. या भागातून जाणाऱ्या केबलमुळं आशिया, ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२३ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५३.०० क्विंटल | २,००१ | २,५७० | २,२६३ |
| ज्वारी/हायब्रिड :२४९.०० क्विंटल | १,६८० | ४,७०० | २,४४३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ८६.५० क्विंटल | १,९०० | २,३९० | २,२२१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४७.५० क्विंटल | ५,५७५ | ५,६५१ | ५,६१३ |
| हरभरा: २५.०० क्विंटल | ५,१७६ | ५,१७६ | ५,१७६ |

# 'व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटी'तून आलेली माहिती अस्वीकार्य

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीकडून आलेली माहिती स्वीकारली जाऊ शकत नाही, अशी टिपण्णी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांनी केली. धार्मिक स्थळांवरील महिलांचा प्रवेश आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या शबरीमला संदर्भातील सुनावणीच्या आठव्या दिवशी सुनावणीवेळी त्यांनी आपले निरीक्षण नोंदवले.**

वरिष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी माहितीचा स्रोत कोणताही असला तरी ज्ञान आणि शहाणपण स्वीकारण्यास हरकत नाही असे न्यायालयात मांडले. कौल यांनी डॉ. शशी थरूर यांचा एका वृत्तपत्रातील लेख उद्धृत केला होता, ज्यामध्ये धार्मिक बाबींमध्ये न्यायालयीन संयम



राखण्याचे आवाहन करण्यात आले होते. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी यावर भाष्य करताना सांगितले की, न्यायालय सर्व नामवंत लेखक आणि विचारवंतांचा ▶▶ पान २ वर

### धार्मिक अधिकार नेहमीच वरचढ ठरत नाही

यावेळी न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या, जेव्हा कलम २५(२)(ब) अंतर्गत कायदा केला जातो, तेव्हा धार्मिक संप्रदायाचा अधिकार नेहमीच वरचढ ठरेल असे म्हणता येणार नाही. हे अधिकार स्वत: सार्वजनिक व्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य यांच्या अधीन आहेत. हे घटक समाजसुधारणा किंवा समाजकल्याण कायद्यांचा आधार असू शकतात. कलम २५ आणि २६ मधील नैतिकता या शब्दाचा अर्थ घटनात्मक नैतिकता असा घेतला जाऊ शकत नाही.

# सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा बजावला हक्क

बारामती । प्रतिनिधी

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अतिशय भावनिक वातावरणात सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा अधिकार बजावला. पार्थ पवार, जय पवार, सुप्रिया सुळे, रेवती सुळे, श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार यांनी मतदान केले. अजित पवारांच्या आईंनी घरीच मतदानाचा अधिकार बजावला. यावेळी या सर्वांनी बारामतीकरांना मतदान करण्याचे आवाहन केले.

आज सकाळी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी खासदार पार्थ पवार आणि ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# कर्मचाऱ्यांचा संताप अन् शासनाची उदासीनता...!

राज्यातील तब्बल १७ लाख शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप हा केवळ प्रशासनाविरुद्धचा रोष नसून शासनाच्या दीर्घकाळ चाललेल्या उदासीनतेवर उमटलेला तीव्र निषेध आहे. या संपामुळे राज्यातील दैनंदिन शासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत असून, सामान्य नागरिकांना त्याचा थेट फटका बसत आहे. मंत्रालयापासून ते जिल्हा पातळीवरील कार्यालये, शाळा, रुग्णालये या सर्वच यंत्रणा विस्कळीत होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

कर्मचाऱ्यांच्या मागण्या नव्या नाहीत. सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना, जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदांची भरती, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, चतुर्थ श्रेणी व वाहनचालक पदांवरील भरतीवरील निर्बंध उठविणे अशा अनेक मूलभूत प्रश्नांवर शासनाने दीर्घकाळ ठोस निर्णय घेतलेला नाही. २०२४ मध्ये जाहीर केलेल्या सुधारीत वेतन आणि निवृत्तिवेतनासंदर्भातील अधिसूचना आजतागायत निघालेली नाही, ही बाब प्रशासनातील विलंब आणि धोरणात्मक अस्पष्टतेचेच द्योतक आहे. संपाच्या पहिल्याच दिवशी मंत्रालयातील जवळपास निम्मे कर्मचारी गैरहजर राहिल्याने कामकाज ठप्प झाल्याचे चित्र समोर आले. नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करूनही काम न होणे, रुग्णालयातील सेवांमध्ये अडथळे निर्माण होणे, शाळांमधील अध्यापनावर परिणाम होणे या सर्व गोष्टींमुळे जनतेचा संताप वाढण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि कर्मचारी यांच्यातील संघर्षाचा फटका नेहमीप्रमाणे सामान्य माणसालाच बसत आहे.

दुसरीकडे, राज्य सरकारने हा संप बेकायदेशीर ठरवत 'मेस्मा' अंतर्गत कारवाईचा इशारा दिला आहे. संपकाळातील वेतन न देणे, शिस्तभंगाची कारवाई करणे अशा कठोर भूमिका जाहीर करण्यात आल्या आहेत. मात्र, केवळ दडपशाहीच्या उपाययोजना करून प्रश्न सुटत नाहीत, हे शासनाने लक्षात घ्यायला हवे. संवादाचा अभाव आणि निर्णय प्रक्रियेतील विलंब हेच या संघर्षाचे मूळ कारण असल्याचे स्पष्ट दिसते. इतिहास साक्षी आहे की, १९७० च्या दशकात वसंतदादा पाटील यांच्या काळात झालेल्या प्रदीर्घ संपाने राज्य प्रशासनाला मोठा धक्का दिला होता. त्या कटू अनुभवाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शासन आणि कर्मचारी संघटनांनी तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे. अन्यथा हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, दोन्ही बाजूंनी संयम आणि जबाबदारीची भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही, तर दुसरीकडे नागरिकांच्या हितालाही तितकेच महत्त्व आहे. शासनाने तातडीने उच्चस्तरीय बैठक घेऊन ठोस निर्णय घ्यावा आणि कर्मचारी संघटनांनीही संवादासाठी खुले राहावे, हीच वेळेची गरज आहे. राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांचा विश्वास गमावणे कोणत्याही सरकारसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे हा प्रश्न केवळ संपापुरता मर्यादित न ठेवता, दीर्घकालीन धोरणात्मक सुधारणा करण्याची संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. अन्यथा प्रशासनातील असंतोषाचे रूपांतर व्यापक अस्थिरतेत होण्याचा धोका कायम राहील.

# महसूल प्रशासनाची वाळू माफियांवर कारवाई; 'तडीपारी'सह कठोर कायद्यांचा इशारा-तहसीलदार चव्हाण

जालना । प्रतिनिधी

**अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी अंबड महसूल प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली असून, आज (गुरुवार) संध्याकाळी ६:०० वाजेनंतर भोकरवाडी टोल नाक्याजवळ अचानक वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मुदत संपलेली ईटीपी पावती असलेल्या दोन मिनी हायवा गाड्या जप्त करून तहसील कार्यालय, अंबड येथे जमा करण्यात आल्या आहेत. तसेच, सराईत वाळू माफिया आणि अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर यापुढे थेट 'तडीपारी' 'एमपीडीए' आणि 'मोक्का' अंतर्गत कठोर कारवाई करण्याची तयारी प्रशासनाने ठेवली आहे.**

ही कारवाई मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल आणि मा. अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच मा. उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली. प्रत्यक्ष कारवाईत तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांच्यासह तलाठी श्री. रामकिशन महाले, श्री. राजेश्वर वैद्य, श्री. श्याम विभूते आणि श्री. दत्ता काळे यांच्या पथकाने सहभाग घेतला. कारवाईचा सविस्तर तपशील भोकरवाडी टोल नाक्यावर तपासणी आज संध्याकाळी पथकाने भोकरवाडी टोल नाक्यावर अचानक वाहनांची तपासणी सुरू केली. यावेळी वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन 'मिनी हायवा' गाड्यांची तपासणी केली असता, त्यांच्या ईटीपी पावतीची वेळ संपलेली असल्याचे निदर्शनास आले. पावतीची मुदत संपल्याने हे दोन्ही हायवा तत्काळ ताब्यात



घेऊन पुढील कारवाईसाठी अंबड तहसील कार्यालयात लावण्यात आले आहेत. वैध पावती असलेल्या वाहनाला मुभा याच तपासणी दरम्यान आणखी एका मोठ्या हायवा गाडीची तपासणी करण्यात आली. सदर वाहनाची ईटीपी पावती पूर्णपणे वैध असल्याचे आढळून आल्याने त्या वाहनाला सोडून देण्यात आले. केवळ अवैध आणि नियमबाह्य वाहतुकीवरच कारवाईचा बडगा उगारला जात असल्याचे यातून स्पष्ट करण्यात आले आहे. माळस पिंपळगाव (गेवराई) प्रकरणातील आरोपींची नावे निष्पन्न काल (दि. २२ एप्रिल) महसूल पथकाने बीड जिल्ह्यातील गेवराई हद्दीतील माळस पिंपळगाव येथे नदीपात्रात अवैध उत्खनन करणाऱ्या 'केन्यांवर' धडक कारवाई केली होती. या प्रकरणी एक विशेष आणि महत्त्वाची बाब म्हणजे, या ठिकाणी अवैध केनीद्वारे उत्खनन करणाऱ्या सर्व केनी धारकांची गोपनीय माहिती प्रशासनाला प्राप्त झाली आहे. त्यांची खात्रीशीर नावे निष्पन्न झाली असून, अंतिम पडताळणी पूर्ण करून या सर्वांवर नावानुसार गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. अवैध वाळू उपसा आणि विनापावती किंवा मुदत संपलेल्या पावतीवर वाहतूक करणाऱ्यांवर यापुढेही अशीच अचानक कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे कोणीही विनापावती वाळूची वाहतूक करू नये. जे कोणी वारंवार वाळू चोरी, अवैध उत्खनन आणि नियमबाह्य वाहतूक करताना आढळतील, त्यांच्यावर केवळ दंडात्मक कारवाई न करता प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून थेट 'तडीपार', तसेच 'एमपीडीए' आणि 'मोक्का' यांसारख्या कठोर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याची पूर्ण तयारी महसूल प्रशासनाने ठेवली आहे. तरी सर्व संबंधित कंत्राटदार, वाहनधारक आणि मजुरांनी नियमांचे तंतोतंत पालन करावे, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा सक्त आदेश या प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात येत आहे.

## द्रोपदाबाई धुमाळ यांचे निधन

परतूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शेवगा येथील द्रोपदाबाई सुंदरराव धुमाळ यांचे दीर्घ आजाराने जालना येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २२ एप्रिल बुधवार रोजी



उपचारादरम्यान निधन झाले. त्या ८३ वर्षाच्या होत्या गुरुवार रोजी शेवगा येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील अनेकांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात मुले,मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी सैनिक रामचंद्र धुमाळ,चत्रभुज धुमाळ व विष्णू धुमाळ यांच्या त्या आई होत.

## बीड मध्ये हिंदू सेवकांनी लेन्सकार्ट बंद पाडले हिंदू विरोधी अटी रद्द करे पर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार

बीड । प्रतिनिधी

**लेन्सकार्ट या नामांकित चष्मे, गॉगल च्या कंपनीने हिंदू कर्मचारी यांच्या साठी जाचक अटी केल्या असून हिंदू धर्माच्या विरोध आहेत. हा हिंदू धर्माचा अपमान असून या विरोधात आज सुभाष रोडवर असणाऱ्या लेन्सकार्ट या शो रूम मध्ये जाऊन आंदोलन करण्यात येऊन शो रूम बंद करण्यात आले. जो पर्यंत या हिंदू विरोधी जाचक अटी रद्द करण्यात येणार नाही तो पर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा आक्रमक पवित्रा हिंदू सेवकांनी घेतला आहे.**




लेन्सकार्ट ही चष्मे, गॉगल साठी नामांकित अशी कंपनी असून या कंपनीने देशात सर्वत्र आपले जाळे विणले आहे. मात्र या कंपनीने जे कर्मचारी कामावर घेतले आहेत त्यांच्यासाठी अर्थात हिंदू कर्मचारी यांच्यासाठी अत्यंत जाचक, अन्यायकारक आणि महत्वाचे म्हणजे हिंदू धर्माच्या विरोधात निमावली बंधन कारक केली आहे. या नामांकित कंपनीने हिंदू कर्मचारी यांच्या साठी हिंदू पुरुष कर्मचारी याने कपाळाला टिळा लावायचा नाही, हातात गंडा घालायचा नाही, कानात बाळी घालायची नाही तर हिंदू महिलांनी कपाळाला टिकली लावायची नाही असे हिंदू धर्म विरोधी नियमावली केली आहे. कामाची गरज असणारे हिंदू बांधव आणि भगिनी निमूट पने येथे काम करत आहेत.अशा हिंदू विरोधी लेन्सकार्ट विरुद्ध आज गुरुवार रोजी सुभाष रोड, बीड येथे असणाऱ्या कंपनीच्या शो मध्ये हिंदू सेवकांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या वेळी या ठिकाणी सर्व उपस्थित हिंदू कर्मचारी यांना गंध लाऊन हातात भगवा गंडा बांधत जय श्री राम, भारत माता की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, वंदे मातरमच्या घोषणा देत लेन्सकार्ट बायकॉट म्हणत निषेध नोंदवण्यात आला. तसेच हिंदू बांधवांनी लेन्सकार्ट मधून खरेदी न करता आपल्या स्थानिक व्यावसायिक यांच्या कडून खरेदी करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच शो रूम बंद करण्यात आले असून जो पर्यंत ही नियमली बदलत नाहीत तो पर्यंत आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा प्रा आनंद बार्शीकर, किशन चव्हाण, प्रमोद पुसरेकर, बाळा चिरके, मयूर भालेकर , शुभम दोडके, कृष्णा पावणे, गणेश नहार, रोहित सिंग ठाकूर, सुजल मिटकरी, कृष्णा जाधव, तुषार दोडके, सुशांत सोनटक्के, अक्षय चव्हाण, विशाल उदावंत, सिद्धार्थ मनसबदार यावेळी देण्यात आला.

## महेश सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अविरोध!

### माजी आ.भीमराव धोंडे गटाचे कारखान्यावर निर्विवाद वर्चस्व

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी,पाटोदा, शिरूर का.मतदार संघासह शेजारील तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची 'कामधेनू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेश सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक अविरोध पार पडली आहे.या निवडणुकीत माजी आ.भीमराव धोंडे यांच्या समर्थकांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत कारखान्याची सत्ता पुन्हा आपल्या ताब्यात ठेवली आहे. कारखान्यासारख्या मोठ्या संस्थेची निवडणूक अविरोध पार पडणे ही संपूर्ण परिसरासाठी अत्यंत आनंदाची बाब मानली जात आहे.या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत आष्टी विधानसभा



मतदार संघाचे भाग्यविधाते व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ.भीमराव धोंडे,युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे यांची महेश सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी अविरोध निवड झाली आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळ खालीलप्रमाणे माजी आ.भीमराव धोंडे आणि डॉ. अजयदादा धोंडे यांच्या नेतृत्वाखालील खालील संचालकांची कारखान्याच्या संचालक मंडळावर अविरोध निवड करण्यात आली आहे. नियामत बेग जगताप संभाजी, झगडे सतीश, ॲड.निकाळजे रत्नदीप,सांगळे गणेश, शिंदे केशव, चव्हाण झुंबर, कर्डिले बजरंग, गावडे गजानन, गर्जे शहादेव,विधाते उद्धव,जगताप दादासाहेब,खेडकर अशोक,मोहोळकर तुकाराम, मुंडे अंकुश,श्रीमती गोल्हार क्रांती श्रीमती नन्नवरे उज्वला,वाघुले बाबासाहेब,दिंडे सदाशिव या सर्व नवनिर्वाचित संचालकांचे आष्टी, पाटोदा, शिरूर परिसरातील शेतकरी,सभासद व नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.

## पान १ वरून...

### शेतकरी सक्षमीकरणासाठी

आणि 'एग्री-स्टॅक' यांसारख्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. राज्यपालांनी या उपक्रमांचे कौतुक करत तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्याचे निर्देश दिले. शेतमालाला योग्य दर मिळावा यासाठी साठवणूक क्षमता वाढवणे, कोल्ड स्टोरेज साखळी बळकट करणे आणि 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या माध्यमातून फलोत्पादनाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावरही चर्चा झाली. नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत ७२ हजार हेक्टर क्षेत्र रसायनमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, कृषी विद्यापीठांच्या संशोधनाचा थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात आला. राज्यपालांनी कृषी विभागाच्या उपक्रमांचे कौतुक करत, केवळ उत्पादन वाढवणे नव्हे तर ''शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे'' हे अंतिम ध्येय असले पाहिजे, असे स्पष्ट केले. दरम्यान, शेतकरी आत्महत्या कमी करणे आणि मॉडेल व्हिलेज संकल्पना प्रभावीपणे राबवणे या विषयांवर सखोल चर्चा करण्यासाठी पूर्ण दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्याची तयारी दर्शवण्यात आली असून, या कार्यशाळेत राज्यभरातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत. ''राज्यपालांसोबतची ही तीन तासांची चर्चा अत्यंत फलदायी ठरली. कृषी शिक्षण, संशोधन आणि प्रशासन यांचा समन्वय साधून 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे स्वप्न साकार करण्यासाठी ही बैठक मैलाचा दगड ठरेल,'' असा विश्वास कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी व्यक्त केला.

-------------

### उद्धव ठाकरे महाविकास

आघाडीच्या वाटेला केवळ एक जागा मिळणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून कुणाला विधान परिषदेत संधी मिळते? ते पाहणं महत्त्वाचं आहे. याआधी राज्यसभेच्या निवडणुकीत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पाठिंबा दिला होता. त्यावेळी कॉंग्रेसला निवडणूक लढायची होती. पण शरद पवार इच्छुक असल्याचं वृत्त समोर आल्यानंतर कॉंग्रेस पक्ष बॅकफूटला गेला होता. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा विधान परिषदेत जावं, अशी भूमिका शरद पवार यांनी याधीच व्यक्त केलेली आहे. विशेष म्हणजे शरद पवार यांनी भर पत्रकार परिषदेत याबाबत भूमिका मांडली होती. उद्धव ठाकरे यांनी आपल्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. त्यामुळे आपणही त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा, अशी आपली भूमिका असल्याचं शरद पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटलं होतं.असं असलं तरी उद्धव ठाकरे हे विधान परिषदेत जाण्यासाठी इच्छुक आहेत की नाहीत? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. उद्धव ठाकरे इच्छूक नसतील तर त्यांच्या जागेवर आपल्याला संधी मिळावी यासाठी त्यांच्या पक्षातील नेत्यांकडून जोरदार लॉबिंग सुरु असल्याची चर्चा आहे. पण महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांची उद्धव ठाकरे यांनीच पुन्हा विधान परिषदेत जावं, अशी भूमिका आहे. उद्धव ठाकरे यांच्या ऐवजी इतर कुणाला उमेदवारी मिळाली तर भाजपकडून निवडणुकीत आणखी एक उमेदवार दिला जाऊ शकतो आणि मविआच्या आमदारांकडून केल्या जाणाऱ्या मतदानात दगाफटका होऊ शकतो, अशी देखील राजकीय वर्तुळात चर्चा आहे.आज उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवास्थानी आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ उपस्थित होते. या बैठकीनंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी सूचक वक्तव्य केलं आहे. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे.

---------------

### कारागृहातील व्हायरल क्लिप नियोजित

वायरल झाली माध्यमांनी त्याच्या बातम्याही केल्या आणि वातावरण तणावाचे निर्माण झाले बंदी असलेल्या कैद्याला फोनवर बोलता येते का हा मुद्दा कायदेशीर असला तरी समोरील व्यक्ती देखील कारागृहातूनच बाहेर आलेला आहे आणि सुरुवातीला या क्लिपमध्ये काय बोलायचे हे वधऊन घेतले असे दिसते म्हणजेच हे नियोजन पूर्ण होते असा संशय आहे मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ज्या व्यक्तीने गंभीर स्वरूपाचे आरोप केले त्याच बंदी असलेल्या व्यक्तीने याबाबतचा खुलासा केला तोही लेखी स्वरुपात केला त्यात त्यांनी म्हटले आहे की काल मी बोललो ते तीन व्यक्तींच्या दबावामुळे या प्रकरणात पूर्वीच्या क्लिप मध्ये घेतलेले नावे त्यांचा काहीही संबंध नाही मसाजोग तालुका केज येथील पोटनिवडणूक आहे या निवडणुकीत त्याचा फायदा व्हावा म्हणून हा प्रकार केला असल्याचे देखील त्याने म्हटले आहे या सर्व प्रकारावरून आता पोलिसांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे त्याची पूर्वनियोजित ऑडिओ क्लिप समाज माध्यमासमोर आणणे त्यावर नेत्यांनी प्रतिक्रिया देणे आणि वातावरण दूषित करणे म्हणजे त्यात गुन्हेगारी कटाचा उल्लेख असल्याने एकच खळबळ उडाली.दोन्ही क्लिप्सच्या सत्यतेबाबत अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांकडून पुढील मागण्या होत आहेत दोन्ही ऑडिओ क्लिप्सची फॉरेन्सिक तपासणी करून सत्य समोर आणावे. जर आरोप खरे असतील तर संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. कारागृहातून अशा क्लिप्स बाहेर कशा येतात, याची चौकशी करून सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर कराव्यात. मोबाईल फोनचा वापर, कट रचणे यांसारख्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी सतर्क राहणे गरजेचे आहे खोटी किंवा दिशाभूल करणारी क्लिप तयार करून समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांवरही कारवाईची मागणी होत आहे.

-----------

### नोकरी जाण्याच्या भीतीने

सहकारी, वरिष्ठ आणि व्यवस्थापनासोबतचे संबंध आणि संवाद, कारण हे घटक देखील मानसिक आजारास कारणीभूत ठरतात. तिसरं म्हणजे कार्यालयाची धोरणे आणि नियम, जसे की कामासाठी, घरून काम करण्यासाठी आणि वैयक्तिक कामासाठी वेळेवर मिळणारी रजा, आणि आरोग्याशी संबंधित लाभ यांच्याशी निगडित आहेत. दरम्यान, कामाच्या ठिकाणी निर्माण होणारे वातावरण लोकांमध्ये हृदयविकार, स्ट्रोक आणि मानसिक आजारांचा धोका वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात असे वैज्ञानिक अभ्यासांमधून मिळालेल्या डेटातून स्पष्ट दिसते. जागतिक आरोग्य संघटना आणि ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज अभ्यासाकडील जागतिक मृत्यूदर आणि आरोग्यविषयक डेटाला हे धोके लागू करून आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने हा डेटा प्रसिद्ध केला आहे.

-------------

### जगावर इतिहासातील

वाढीसह ९६.७३ डॉलर्स प्रति बॅरलवर पोहोचले. दरम्यान भारतात सध्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. राजकीय सभा सुरू आहेत, मतदान होत आहे आणि राजकीय वक्तव्यबाजी वाढत आहे. पण या राजकीय गदारोळात सर्वसामान्यांची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे.ही चिंता पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींशी संबंधित आहे. गेल्या एक महिन्यापेक्षा अधिक काळापासून पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक तेल बाजार तणावाखाली आला आहे. क्रूडच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली असून पुरवठ्याच्या प्रमुख मार्गांवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे आणि ऊर्जेची आयात करणा-या राष्ट्रांना आयातीसाठी आधीच अधिक पैसे मोजावे लागत आहेत. यादरम्यान, सरकारे आणि ग्राहक आयातीचा वाढीव खर्च सोसत असल्याने अनेक देशांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीचा भडका उडाला आहे.

---------

### केजरीवालांचे न्यायालयीन

आहेत.अरविंद केजरीवाल ज्यांच्या सुनावणीचा हा व्हिडिओ आहे, रवीश कुमार: ज्येष्ठ पत्रकार ज्यांनी हा आशय प्रसारित केल्याचा आरोप आहे. इतर सोशल मीडिया युजर्स: ज्यांनी हे व्हीडीओ शेअर किंवा अपलोड केले आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स: एक्स, इंस्टाग्राम आणि यूट्यूबला हे व्हीडीओ त्वरित काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत.

--------------

### नवीन गॅस कनेक्शनला अंशत: स्थगिती

एका ग्राहकाने ट्विटर त्याला नवीन एलपीजी गॅस कनेक्शन मिळत नसल्याबाबत तक्रार केली होती. त्यावर आता सरकारी कंपनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने आपल्या अधिकृत अकाऊंटवरून ट्विट करून प्रत्युत्तर दिले. त्यात बीपीसीएल म्हणते की भूराजकीय परिस्थिती पाहता नवीन एलपीजी गॅस कनेक्शन देणे काही काळासाठी बंद केलेले आहे. सध्या वितरक हे गॅस रिफ्युअलिंगवरच जास्त भर देत आहेत. जी काही असुविधा होत आहे त्याची कारणे आमच्या नियंत्रणाबाहेरची आहेत.तणावपूर्ण भूराजकीय परिस्थिती कायम राहिल्यानं गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत बुधवारी पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितलं की, 'घरगुती वापरासाठीच्या एलपीजीच्या पुरवठ्याला प्राधान्य दिलं जात आहे. सध्याच्या घडीला तरी एलपीजी वितरकांकडील साठा संपुष्टात येत आहे अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, पेट्रोलियम मंत्रालय, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, बीपीसीएल आणि हिंदूस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर मिळालेले नाही.

---------------

### इराणचा नवा डाव, इंटरनेट

यूरोप आणि आफ्रिका या सारख्या देशांना इंटरनेट कनेक्टव्हिटी मिळते. होर्मुझच्या सामुद्रधुनीत टाटा गल्फ, गल्फ ब्रिज इंटरनॅशनल केबल सिस्टीम्स, आणि -१ या सारख्या मोठ्या कंपन्यांच्या केबल सिस्टीम्स आहेत. याद्वारे मोठ्या कंपन्यांच्या डेटा सेंटरला इंटरनेट कनेक्टिव्हिटी पुरवली जाते. इराणनकडून होर्मुझची सामुद्रधुनी युद्ध थांबवण्यासाठी दबाव वाढवण्याचा भाग म्हणून बंद केली होती. आता अमेरिकेनं देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकाबंदी केली आहे. या मार्गातून सागरी वाहतूक जवळपास बंद झाली आहे. इराणनं या मार्गात मॉइन्स देखील पेरले असल्याचे रिपोर्ट आले होते, त्यामुळं संकट वाढलं आहे. याशिवाय लाल समुद्रातील अल-मंडेब चामार्ग देखील सुरक्षित राहिला नव्हता. मीडिया रिपोर्टनुसार इराणकडून अमेरिकेवर दबाव वाढवण्यासाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या इंटरनेट केबलला निशाणा केलं जाऊ शकतं. इंटरनेट केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीला खूप वेळ लागू शकतो. सध्या होर्मुझमध्ये जहाजं जात नसून केबलचं नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी वेळ लागेल. दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील दुसऱ्या टप्प्यातील शांतता चर्चेबाबत पाकिस्तान आशावीद असल्याचं दिसतं. मात्र, अमेरिका आणि इराण यांची चर्चेसाठी सहमती होताना दिसत नाही. याशिवाय इराणच्या आयआरजीसीकडून भारताकडे येणाऱ्या जहाजावर हल्ला करुन ते ताब्यात घेतल्याचं काल समोर आलं होतं. .

----------------

### सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह

जय पवार यांनीही याच ठिकाणी मतदान करत लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवला. याप्रसंगी सर्व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.मतदानाचा हक्क बजावल्यानंतर सुनेत्रा पवार भावूक झाल्या. त्यांनी यावेळी सांगितले की, 'अत्यंत भावनिक वातावरणामध्ये आजची पोटनिवडणूक होत आहे. आताच मी आपल्या सर्वांच्या समक्ष मतदान केले. बारामतीची जनता गेली ६ दशके पवार कुटुंबाच्या मागे उभी आहे. आदरणीय अजितदादा यांच्याबद्दलचे प्रेम, विश्वास आधार आणि त्यांनी दिलेले योगदान यासाठी बारामतीची जनता मोठ्या संख्येने उत्साहाने नव्हे तर कर्तव्य म्हणून मतदानासाठी बाहेर पडत आहे. आजचे हे मतदान दादांनी बारामतीकरांसाठी इतकी वर्षे केलेल्या योगदानाची परतफेड म्हणून आहे. दादांना श्रद्धांजली म्हणून सर्व गावांमधून मतदानासाठी मोठ्या संख्येने लोक बाहेर पडताना दिसली

----------

### 'व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी'तून

आदर करते; परंतु अखेर तो लेख म्हणजे एक वैयक्तिक मत आहे.वैयक्तिक मत हे वैयक्तिकच असते. याचाच अर्थ असा की, अशा मतांचे न्यायालयावर कोणतेही बंधनकारक मूल्य असू शकत नाही. सरन्यायाधीशांच्या निरीक्षणावर बोलताना कौल म्हणाले की सर्व स्रोतांकडून माहिती घेण्यास काहीच हरकत नाही. जर ज्ञान आणि शहाणपण कोणत्याही स्रोतातून, देशातून किंवा विद्यापीठातून येत असेल, तर त्याचे स्वागत केले पाहिजे. आपली संस्कृती इतकी समृद्ध आहे की आपण ज्ञानाच्या सर्व स्वरूपांचा स्वीकार केला पाहिजे. त्यावर न्यायमूर्ती नागरत्नाम्हणाल्या, पण व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीतून नाही.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि.२४ एप्रिल २०२६ ३

## थोडक्यात



### डॉ.भावना धन्वे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज आणि जनरल हॉस्पिटल सायन या कॉलेजमधून एमबीबीएस उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ. भावना धन्वे यांचा वडील व आईने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. डॉ. भावना बाळू धन्वे ( पदवी ) मिळाल्याबद्दल तिच्या नातेवाईकाकडून तिचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी उषा बाळू धन्वे, संपादक उत्तम ओव्हाळ, प्रतिक्षा उत्तम ओव्हाळ, उत्तम रावसाहेब धन्वे, अनिल रावसाहेब धन्वे, चंद्रसेन रावसाहेब धन्वे, सिद्धेश्वर गौतम धन्वे, प्रीतम आत्तम धन्वे, रोहन सखाराम धन्वे, प्रतीक उत्तम धन्वे, अक्षय सुनील धन्वे, निषाद बापूराव धन्वे, सौरभ चंद्रशेखर धन्वे, विनोद गौतम धन्वे, प्रदीप आतम धन्वे यांच्या वतीने डॉ. भावना बाळू धन्वे हीचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### कऱ्हेवडगावात आज ह.भ.प. धनंजय महाराज कदम यांचे कीर्तन मोठ्या संख्येने उपस्थित रहा–गायकवाड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथे परंपरेने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा सोहळ्याला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून गावासह पंचक्रोशीत भक्तीमय वातावरणाची उधळण झाली आहे. सलग ४० व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या वैभवशाली धार्मिक परंपरेमुळे कऱ्हेवडगाव हे भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले आहे.



ह.भ.प. संत वामनभाऊ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि ह.भ.प. रणजितबापू महाराज यांच्या प्रेरणेने मंगळवार दि. २१ ते २८ एप्रिल २०२६ या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ''गुरू एक परब्रह्म आहे, ज्याचे वर्म कळते तेथेच देव खरा'' या संदेशाचा प्रसार या सप्ताहातून केला जात आहे. व्यासपीठ चालक म्हणून ह.भ.प. रामकृष्ण महाराज ज्ञानेश्वरी पारायण करत असून भागवताचार्य ह.भ.प. राजदीप महाराज आंधळे भाविकांना मार्गदर्शन करत आहेत. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ दरम्यान भव्य हरिकीर्तन व हरीजागर होत आहे.

या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांनी आपली सेवा दिली असून आज शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी ह.भ.प. धनंजय महाराज कदम यांचे हरिकीर्तन होणार आहे. तसेच शनिवार दि. २५ एप्रिल रोजी ह.भ.प. कार्तिकीताई जायभाय, रविवार दि. २६ एप्रिल रोजी ह.भ.प. प्रवीण महाराज मुळे, तर सोमवार दि. २७ एप्रिल रोजी धर्माचार्य ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे (महादेवगड) यांचे कीर्तन होणार आहे.

**महंत विठ्ठल महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता**

मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत गहिनीनाथगडाचे ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार असून त्यानंतर भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात ह.भ.प. किसन महाराज शिंदे यांच्यासह अनेक टाळकरी, पखवाज वादक व भजनी मंडळे सेवा देत आहेत. ४० वर्षांची अखंड परंपरा जपत हा सोहळा गावातील एकात्मता, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. गावातील तरुण मंडळे, महिला व ग्रामस्थ या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन, नामस्मरण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच सौ. वंदनाताई व परिवंत गायकवाड यांच्यासह समस्त ग्रामस्थ कऱ्हेवडगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनगणना प्रशिक्षणाला सुरुवात; तहसीलदार शेळके यांची पाहणी

बीड । प्रतिनिधी

आगामी जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर बीड तालुका ( ग्रामीण ) येथे प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षणासाठी व्यापक तयारी करण्यात आली असून उद्यापासून या प्रशिक्षणास औपचारिक सुरुवात होणार आहे . नगर रोडवरील चंपावती इंग्लिश स्कूल येथे हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे . या ठिकाणी तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन तयारीची पाहणी केली आणि संपूर्ण व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.




प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा बसण्याची व्यवस्था , तांत्रिक साधने , प्रशिक्षण साहित्य , डिजिटल सादरीकरणाची तयारी यांची बारकाईने तपासणी करण्यात आली . यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी प्रशिक्षण सुरळीत पार पडावे यासाठी आवश्यक सूचना दिल्या. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनतेस उद्देशून आवाहन करताना म्हटले की , '' जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे . नागरिकांनी अचूक व प्रामाणिक माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे . जनगणनेतून मिळणारी माहिती भविष्यातील योजना आणि धोरणांसाठी आधारभूत ठरणार आहे . '' अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी प्रशिक्षण प्रक्रियेबाबत सूचना देताना सांगितले की , '' प्रगणक व पर्यवेक्षक यांनी प्रशिक्षण काळात प्रत्येक मुद्दा नीट समजून घ्यावा . माहिती संकलन करताना अचूकता आणि गोपनीयता राखणे अत्यावश्यक आहे . डिजिटल साधनांचा योग्य वापर करून काम अधिक प्रभावीपणे करावे . '' निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले की , '' जनगणना ही एक जबाबदारीची प्रक्रिया आहे . प्रत्येक प्रगणकाने आपल्या क्षेत्रातील नागरिकांशी संवाद साधून विश्वास निर्माण करावा आणि माहिती संकलन पारदर्शक पद्धतीने करावे . '' उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना सांगितले की , '' ही प्रक्रिया केवळ आकडे गोळा करण्यापुरती मर्यादित नसून ती समाजाच्या विकासाशी निगडित आहे . प्रत्येकाने आपली भूमिका जबाबदारीने पार पाडली पाहिजे . '' प्रशिक्षण योजनेनुसार विविध टप्प्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे . पहिल्या टप्प्यात १८० प्रगणक आणि ३० पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार असून पुढील टप्प्यांमध्ये ही संख्या वाढणार आहे . एकूणच ७०० हून अधिक कर्मचारी या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत . या प्रशिक्षणामध्ये घरांची स्थिती , कुटुंब माहिती , मूलभूत सुविधा , तंत्रज्ञान वापर , वाहतूक साधने इत्यादींची माहिती कशी संकलित करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे . तसेच डिजिटल पद्धतीने माहिती नोंदविण्याचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे . एकूणच , बीड जिल्हा प्रशासनाने जनगणना २०२७ साठी सर्वतोपरी तयारी केली असून प्रशिक्षणाच्या माध्यमातून ही प्रक्रिया अधिक प्रभावी आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न केला जात आहे . प्रशासनाच्या या उपक्रमाला नागरिकांनीही सहकार्य करावे , असे आवाहन करण्यात आले आहे .

# श्रीक्षेत्र नेकनुरमध्ये आठ दिवस अवतरणार भक्तीपंढरी

नेकनुर । प्रतिनिधी

वारकरी सांप्रदायाचे भक्ती सूर्य संत श्रीगुरु. बंकटस्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित श्री क्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भव्य श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे . दि २५ एप्रिल २०२६ वार शनिवार ते दिनांक २ मे २०२६ वार शनिवार या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य विदर्भरत्न श्री ह भ प गुरुवर्य संजय महाराज पाचपोर यांच्या सुश्राव्यवाणी मधून श्रीराम कथा श्रवण करता येणार आहे. तसेच आठ दिवस महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.यात २४ तास अखंड अन्नदान आणि ज्ञानदान सोहळा होणार आहे.. या सर्व कार्यक्रमाला भाविक भक्तानी लाभ घ्यावा. असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे..




बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवाला दि २५ एप्रिल पासून सुरुवात होणार आहे यात आठ दिवस कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे..पहाटे ४ ते ६ काकडा भजन ,सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण , १० ते १२ गाथा भजन , दुपारी १२ ते २ भोजन ,२ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरीपाठ रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन व ११ नंतर संगीत भजन व हरीजागर होईल . दिनांक २५ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामींच्या पालखीची नेकनूर येथिल बंकटस्वामी शिक्षक कॉलनी येथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे. शोभा यात्रेनंतर संत महानतांच्या हस्ते ग्रंथ पूजन टाळ मृदंग पूजन विना पूजनाने सप्ताह सुरुवात होईल.

या सप्ताहात पहिला दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प रामेश्वर महाराज शास्त्री ब्रम्हनाथ येळंब, दुसरा दिवस ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर सेलू , तिसरा दिवस श्री ह.भ.प. शांतीब्रह्म महादेव महाराज चाकरवाडीकर, चौथा दिवस ह भ प विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, पाचवा दिवस अमृताश्रम स्वामी महाराज, सहावां दिवस ह.प.भ. उमेश महाराज दशरथे, आळंदी देवाची,सातवा दिवस श्री ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर परभणी ,यांचे कीर्तन पुष्प होणार आहे. दिनांक १३ मे रोजी श्री ह.भ.प.ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेगावकर अध्यक्ष वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांचे सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल . तरी सर्व भाविक भक्तांनी या कथा,किर्तन,भजन श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकटस्वामी मठ नेकनुर , पंढरपूर , आळंदी,विश्वस्त ,अन्नदान कमिटी ,गावकरी मंडळी नेकनुरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जय जवान माध्यमिक विद्यालयात छ.शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर, 'विविध दाखल्यांचे' मोफत वितरण

वडवणी । प्रतिनिधी

''अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित'' संस्थेचे जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रं ०१ अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शालेय शिक्षणासाठी उपयुक्त असणारे विविध दाखल्यांचे वितरण या उपक्रमांतर्गत शैक्षणिक सत्र २०२५ २०२६ मध्ये मोफत वाटप करण्यात आले.




या शिबिरात विद्यालयातील प्राचार्य श्री.सारोक्ते डी जी सर यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक वर्ग यांना महसूल विभाग महाराष्ट्र शासन यांच्या उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्षात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रं ०१ अंतर्गत विभागाद्वारे देण्यात आलेल्या माहिती नुसार सर्व प्रकारची माहिती विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून दिली.सदरील उपक्रमांतर्गत विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांचे प्रस्ताव तहसील कार्यालयात कवडगाव मंडळ अधिकारी श्री. शेळके साहेब यांच्याकडे विद्यालयातील एकूण ९७ विद्यार्थ्यांचे विविध दाखल्यांचे मागणी प्रस्ताव दाखल करण्यात आले होते.त्या मधील काही राष्ट्रीयत्व दाखला, वय व अधिवास दाखला,उत्पन्नाचे दाखला, असे विविध दाखल्यांचे प्रस्ताव विद्यालयातून दाखल करण्यात आले. त्यापैकी सर्व विद्यार्थ्यांना एकूण ९७ दाखले प्रशासनाकडून मोफत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर मध्ये मोफत मिळाले असून याचा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी उपयोग होणार आहे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. व सर्व पात्र विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. या कामी विद्यालयातील क. ली श्री. मुंडे एस एच सर यांची विशेष कामगिरी मोलाची ठरली. त्याच बरोबर सर्व पालक वर्ग , सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांचेही उत्स्फूर्त पणे आपला प्रतिसाद दिला. घाडगे सर, तळे सर,चोपडे सर, येवले सर, तर मॅडम, यादव सर, गोंद्रे,पाखरे, ससाणे, काळे आदी सर्वांचे मोलाची कामगिरी ठरली.

# कष्टातून यशाचे शिखर: माजलगावच्या भोई समाजातील पहिली महिला डॉक्टर स्वाती भुजंगे

माजलगाव । प्रतिनिधी

जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, हे माजलगाव येथील डॉ.स्वाती राजाभाऊ भुजंगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. मराठवाड्यातील भोई समाजातून एम.बी.बी.एस. () पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या महिला विद्यार्थिनी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे.



डॉ.स्वाती यांचे वडील, राजाभाऊ भुजंगे, व्यवसायाने मच्छीमारी व वीट भट्टी कामगार आहेत. अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. स्वतः उन्हात–पाण्यात मेहनत करून त्यांनी मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. एका मच्छीमार वडिलांच्या कष्टाचे चीज करत स्वाती यांनी वैद्यकीय क्षेत्रात हे दैदीप्यमान यश संपादन केले आहे. स्वाती यांनी आपले एम.बी.बी.एस.चे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून यशस्वीपणे पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आत्मविश्वास ढळू दिला नाही. भोई समाजातील मुलींनी उच्च शिक्षणाकडे वळावे, यासाठी त्यांचे हे यश मैलाचा दगड ठरणार आहे. मराठवाड्यातील भोई समाजाच्या वतीने डॉ.स्वाती भुजंगे यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. ''समाजातील एका मुलीने डॉक्टर होणे, ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे,'' अशा भावना समाजातील मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत. डॉ.स्वाती भुजंगे यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलींना शिक्षणाची नवी उमेद मिळाली आहे.शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे, हे स्वाती यांनी दाखवून दिले आहे.''

# आबुज यांना दिलासा, पण फक्त चार आठवड्यांसाठी!

## खानापूर ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच अपात्रतेच्या आदेशाला खंडपीठात स्थगिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

'बकरे की माँ कब तक खैर मनाएगी' अशी अवस्था खानापूर ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांबाबत झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी पंडित आबूज आणि सोजरबाई क्षीरसागर यांना सरपंच, उपसरपंच पदावरून अपात्र घोषित केल्यानंतर विभागीय आयुक्तांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कायम ठेवत स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्यानंतर या दोघांनीही मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात स्थगिती अपिल दाखल केले होते.यात खंडपीठाने जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या अपात्रता आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे.शिवाय विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित असलेल्या अपिलावर चार आठवड्यात अंतिम निर्णय द्यावा, असे आदेश पारित केले आहेत. म्हणजेच या दोघांनाही महिनाभराचा दिलासा आहे. याबाबत अपिलकर्ते विकास खंडू कांबळे म्हणाले, खंडपीठाचा स्थगिती आदेश म्हणजे कायमस्वरूपी पदावर बसण्याचा अधिकार नाही. महिनाभरानंतर का होईना दोघांनाही पदावरून पाय उतार व्हावंच लागणार असल्याचे ते म्हणाले.

खानापूर ग्रामपंचायतीच्या राजकारणात पत्रकार बालाजी मारगुडे आणि जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांच्यात राजकीय सामना आहे. २०२३ साली झालेल्या निवडणुकीत आबुज यांच्या पॅनलने विजय मिळवला होता. त्यासाठी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपली प्रतिष्ठा आबुज यांच्यासाठी पणाला लावली होती. विधानसभेच्या आमदाराने थेट छोट्याश्या ग्रामपंचायतीत लक्ष घातल्याने संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. निकालानंतर विकास खंडू कांबळे यांनी सरपंच, उपसरपंच यांच्या निवडीवर आक्षेप घेतला. या दोघांनी देखील उद्यानासाठी राखीव असलेल्या ५ एकर भुखंडावर प्लॉटींग पाडून ते विकले होते. तर काही फ्लॉट स्वतःसाठी ठेवलेले होते. हा संपूर्ण प्रकार ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डवर आहे. जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल झाले तेव्हा अतिक्रमण तपासण्यासाठी बीडीओच्या नेतृत्वात विस्तार अधिकाऱ्यांनी गावात येऊन प्रत्यक्ष पाहणी करीत ग्रामपंचायतीच्या अभिलेखाची देखील तपासणी केली होती. त्यांनी दिलेल्या अहवालात अतिक्रमण असल्याचे आणि अभिलेखात व्हाईटनर लावून खाडाखोड केल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी देखील हा प्रकार गंभीर असल्याचे आपल्या निकाल पत्रात म्हटले होते. त्यावरूनच पंडित आबूज आणि सोजरबाई क्षीरसागर यांना अपात्र घोषित केले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाला स्थगिती मिळावी यासाठी त्यांनी विभागीय आयुक्तांकडे स्थगिती अपिल दाखल केले होते. मात्र विभागीय आयुक्तांनी देखील आबुज आणि क्षीरसागर यांनी केलेले कारनामे पाहून स्थगितीस नकार दिला होता. त्यानंतर त्यांनी खंडपीठात स्थगिती मिळवण्यासाठी अर्ज केला. इथे त्यांना न्यायमुर्ती एस.जी. चपळगावकर यांनी तात्पुरता म्हणजेच चार आठवड्यांचा दिलासा दिलेला आहे.

शिवाय विभागीय आयुक्तांनी हे अपिल चार आठवड्यात निकाली काढावे असे आदेशीत केले आहे. त्यामुळे कल्याण आबुज गटाला आजचे मरण उद्यावर एवढ्याच साठी आनंद व्यक्त करता येईल, असे विकास खंडू कांबळे यांनी म्हटले आहे.

## पान ६ वरुन...

### माजलगांवात महावितरणचा

समस्या निर्माण झाली असून व्यापाऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. महावितरणने कामाचे योग्य नियोजन करून फक्त संबंधित भागातच वीजपुरवठा बंद ठेवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, महावितरण प्रशासनाने याबाबत स्पष्टीकरण देऊन भविष्यात अशी परिस्थिती टाळावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मेंटेनस च्या नावाखाली नागरिकांना वेठीस?

सध्या कार्यरत असलेले अभियंता सांगुलकर हे देखभाल (मेंटेनन्स) कामांच्या नावाखाली संपूर्ण माजलगांव शहराचा वीजपुरवठा खंडित करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. योग्य नियोजनाअभावी नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### शासकीय निधीतून बोगस

यांनी संगनमत करुन वरील पैकी काही कामे न करता कागदोपत्री काम केल्याचे बोगस कागदपत्रांच्या आधारे बीले उचलली आहेत. काही कामे बोगस व निकृष्ट दर्जाची करून कामात अनियमितता आणुन ग्रामसेवक,सरपंच,अभियंता यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून शासनाचा २५ लाख रुपये निधी हडप केला असे निवेदनात नमूद केले आहे. सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व पदांचा गैरवापर करून कामात अनियमितता आणुन भ्रष्टाचार केल्या प्रकरणी सरपंच व उपसरपंचावर अपात्रतेची कार्यवाही करावी अशी मागणी मनोज साळवे यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे

राहावे असे आवाहन महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अॅड. सुभाष भाऊ राऊत, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, व शहराध्यक्ष नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे, रंजित सोन्नर, अजिंक्य सुरवसे, स्वप्नील शिंदे, सावता काळे, अजय राऊत, शरद विटकर, महेश वेवहारे, नामदेव मेत्रे, वैभव खेत्रे, ज्ञानेश्वर राऊत, सुशील चौधरी, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शुभम आखाडे यांच्यासह समता सैनिकांनी केले आहे.

### शिक्षणाधिकारी मोरे

होते. गेल्या काही महिन्यात असून योजना शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्राथमिक शिक्षण विभागाचा अतिरिक्त पदभार आता कायमस्वरूपी शिक्षण अधिकारी आले आहे आज त्यांचे स्वागत उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे ऋषिकेश शेळके कक्ष अधिकारी आनंत खेडकर यांनी केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सरकारी शाळा टिकवण्याची जबाबदारी

करण्यात आला. आपल्या मनोगतात श्रीमती भोंडवे यांनी सेवाकाळातील अनुभव सांगत सहकारी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष रोडे, मोहन शिंदे, बाबासाहेब भोंडवे, भगवान शिंदे, मच्छींद्र राख सर, जयराम बांगर सर, विजय नागरगोजे सर , मळेकर सर, नजान सर, जनार्धन वनवे सर जालींदर बेदरे सर ,बाबासाहेब सानप सर, भागवत बांगर सर, तात्या भोंडवे, गोल्हार सर, गोपालघरे सर, बाळासाहेब जगताप तसेच तालुक्यातील तांबा राजुरी, डोमरी, नायगाव केंद्रातील सर्व शिक्षक–शिक्षिका व गावातील महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डोमरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री दिलीप खाडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाबासाहेब सानप यांनी मांडले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाने विशेष परिश्रम घेतले.

### बीड येथे आंबेडकरी मातंग

उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लहुजी क्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विकास पाथरीकर असणार असून डॉ. मिलिंद आवाड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या मान्यवरांच्या मार्गदर्शनातून समाजाच्या विविध प्रश्नांवर दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.परिषदेच्या माध्यमातून समाजातील ऐक्य बळकट करण्यासोबतच सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमान यासाठी ठोस भूमिका निश्चित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विविध स्तरांवरील कार्यकर्ते, युवक व समाजातील मान्यवर यांच्यात संवाद साधून संघटन मजबूत करण्यावरही भर दिला जाणार आहे.या परिषदेस बीड जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजातील सर्व नागरिक, कार्यकर्ते व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाबुराव गालफाडे, कल्याण ताकतोडे, प्रताप मोरे यांच्यासह आयोजकांनी केले आहे.

### न्यु व्हिजन पब्लिक

आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपप्राचार्य वसंतराव चव्हाण, तर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले हे होते. तर यावेळी विचारमंचावर श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी संचालक सौ.डिंपल संकेत मोदी, समन्वयक विनायक मुंजे आणि न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य पांडुरंग पाटील हे उपस्थित होते. सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती देवी पुजन आणि दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, पापा मोदी यांनी व्यापक दृष्टीकोन ठेवून अंबाजोगाईत मुंबई, पुणे, नागपुर व छत्रपती संभाजीनगरच्या धर्तीवर इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण व सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून देत न्यु व्हिजन पब्लिक स्कूल सुरू केले. या शाळेने सतत १६ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून गुणवता जोपासली आहे. न्यु व्हिजन पब्लिक स्कूल हे विद्यार्थ्यांत ध्येयवाद रूजविणारे आहे असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी केले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६



# बीड येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात होणार मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

बीड। प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजन केले आहे दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी बीड येथील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव बीडमध्ये दिनांक ०१ ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड ) येथे केले आहे आयोजन समितीचे मुख्य संयोजक महेश बेदरे , स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा ,महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी , महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना, ऍग्रो इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे.

कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत एकदिवसीय पशुप्रदर्शन तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे या प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या कष्टाळू ,जिद्दी ,मेहनती ,प्रगतशील शेतकर्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी शेतकऱ्यांच्या गौरव करण्यात येतो संस्थेच्यावतीने आत्तापर्यंत गेल्या १८ वर्षांत १८८ शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे मानपत्र ,सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येते शेतकरी हा केंद्रबिंदू मानून ज्यांनी कृषी क्षेत्रात विशेष कामगिरी केली अशा सर्वांना या पुरस्कारासाठी नामांकन करता येते या पुरस्कारासाठी स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे नामांकन पुरस्कृत केले जाईल दरवर्षीप्रमाणे दिला जाणार कृषिरत्न पुरस्कार हा कृषी शास्त्रज्ञ, कृषी संस्था, कृषी क्षेत्रातील अधिकारी, कृषी क्षेत्रातील मंडळ, रोपवाटिका ,बियाणे उत्पादक ,कृषी क्षेत्रातील पत्रकार व कृषी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे नवयुवक तरुण या तीन श्रेणींमधून एकूण ११ व नव्याने युवा गौरव पुरस्कार तरुण शेतकर्यांना देऊन सन्मानित केले जाईल दिनांक ४ मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित केले जाईल पुरस्कारांसाठी आपली संपूर्ण माहिती २ फोटो सह ३० एप्रिल पर्यंत किसान कृषी विकास प्रतिष्ठान ,बेद्रे अँटो सेल,नवीन बसस्थानका समोर गेवराई जिल्हा बीड या पत्त्यावर पाठवावी अथवा ८६००४७४६०६ या व्हॉट्सआपवर पाठवावे.या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने मुख संयोजक कृषिभूषण महेश बेदरे,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव, पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे, नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे, प्रसिद्धी विभाग समिती प्रमुख मजीद शेख, सुभाष चौरे, उत्तम हजारे, संपादक संजय मालानी, संपादक कामरान शेख, संपादक जालिंदर धांडे, चर्चासत्र समितीप्रमुख जुबेर पठाण, धनंजय गुंदेकर पशुप्रदर्शन समिती सखाराम शेळके डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे

## अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा



धाराशिव : सध्या राज्यातील वातावरणात मोठा बदल होताना दिसत आहे. अनेक भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. तर काही भागात अवकाळी पाऊस आणि गारपीट होताना दिसत आहे. धाराशिव जिल्ह्यातील धारूर गावात देखील गारपीट झाल्यानं शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी गावातील शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच सरकार मदत करणार असून, खंबीर राहा असा धीर देखील शेतकऱ्यांना दिला.

धाराशिवच्या धारूर गावात गारपीटीनं प्रचंड मोठ नुकसान झाला असून, या नुकसानीचा आढावा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. प्रताप सरनाईक यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून शेतकऱ्यांबरोबर संवाद साधला.

शेतातील नुकसानीची माहिती जाणून घेत शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला आहे. सरनाईक यांनी तात्काळ जिल्हाधिकारी यांना तात्काळ पंचनामे करा, एखादं नुकसान जास्त दाखवलं तरी चालेल पण कमी करु नका, कमी करुन शेतकऱ्यावर अन्याय करु नका असे आदेश प्रताप सरनाईक यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना दिले आहेत. यावेळी शेतकऱ्यांनी मदतीबाबत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना विचारले असता पंचनामे होऊ द्या सरकार तुम्हाला मदत करेल असं आश्वासनही यावेळी प्रताप सरनाईक यांनी दिलं आहे.

धाराशिव तालुक्यात मंगळवारी, २१ एप्रिल रोजी दुपारनंतर अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावत भयंकर वादळी वारे, गारपीट आणि मुसळधार पावसाचा तडाखा दिला. धारुर, केशेगाव, कोल्हेगाव आदी परिसरात या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीसह मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विठ्ठलवाडी येथे वीज कोसळून एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन आकाश काळवंडले आणि काही क्षणातच जोरदार वादळी वारे सुरू झाले. त्यानंतर मुसळधार पावसासह मोठ्या आकाराच्या गारांचा मारा झाला. विशेषतः धारूर परिसरात गारपीट इतकी तीव्र होती की, शेत जमिनींसह रस्तेही गारांच्या थराने पांढरेशुभ्र झाले. अनेक ठिकाणी गारांचा खच साचल्याने जणू बर्फवृष्टी झाल्याचा भास होत होता.

## फुलकोबी लागवड आणि काळजी

जीवनसत्त्वयुक्त फुलकोबीचे दाट घड तुम्ही तुमच्या घरामागील बागेतच वाढवू शकता. फुलकोबी हे थंड हवामानातील पीक असून, ते वसंत ऋतूच्या सुरुवातीला, शरद ऋतूमध्ये आणि काही हवामानांमध्ये हिवाळ्याच्या महिन्यांपर्यंतही उत्तम वाढते. उन्हाळ्याच्या महिन्यांत फुलकोबी वाढवणे शक्य असले तरी, तापमान खूप जास्त असल्यास फुलकोबीला लवकर तुरे येतात.

फुलकोबीच्या झाडांना इतर कोबीवर्गीय भाज्यांपेक्षा सौम्य आणि गोड चवीची लहान फुले येतात. फुलकोबीचे गट्टे प्रामुख्याने पांढरे असले तरी, या जीवनसत्त्वयुक्त पिकात काही आकर्षक रंगांचे प्रकारही आढळतात. तुम्ही कोणत्याही रंगाची फुलकोबी पिकवली तरी, तिचे पौष्टिक मूल्य साधारणपणे सारखेच असते. सर्व प्रकारांमध्ये जीवनसत्त्वे सी, के आणि ई, अँटीऑक्सिडंट्स, फोलेट आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. ही झाडे १८ ते ३६ इंच उंच वाढतात आणि त्यांना रुंद, हिरवी पाने व एक मोठा मध्यवर्ती देठ असतो, ज्यावर फुलांच्या कळ्या येतात. या कळ्यांना फुले येण्यापूर्वीच अन्न म्हणून काढणी केली जाते. फुलकोबी कोणत्याही भाजीच्या बागेसाठी एक फायदेशीर पीक आहे, परंतु तिची काळजी कशी घ्यावी आणि वाढताना कोणत्या धोक्याच्या सूचनांकडे लक्ष द्यावे हे माहित नसल्यास, तिची लागवड करणे थोडे अवघड असू शकते. फुलकोबी लागवडीसाठी आमचे मार्गदर्शक: लागवड आणि काळजी घेण्यासंबंधीच्या सूचना नक्की वाचा, जेणेकरून तुम्हीसुद्धा या सुंदर, पोषक-समृद्ध पिकाचे फायदे मिळवू शकाल.

आदर्श मातीची रचना : बागेतील मातीमध्ये भरपूर सेंद्रिय पदार्थ आणि चांगले कुजलेले कंपोस्ट खत मिसळा. फुलकोबीची वाढ पोषक तत्वांनी समृद्ध, पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या आणि सुमारे ६.० ते ७.० पीएच असलेल्या जमिनीत सर्वोत्तम होते. जर तुम्हाला तुमच्या बद्दल खात्री नसेल, तर तुम्ही तुमच्या स्थानिक गार्डन सेंटरमधून माती परीक्षण किट घेऊ शकता किंवा तपासणीसाठी मातीचा नमुना तुमच्या स्थानिक विस्तार कार्यालयात नेऊन देऊ शकता.

फुलकोबी कुठे वाढवावी : फुलकोबी उंच वाफ्यांमध्ये, कुंड्यांमध्ये किंवा घरामागील बागेत जमिनीत लावता येते. रोपाची मुळे थंड राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे रोपाची वाढ चांगली होते. तापमान आणि आर्द्रता नियंत्रित ठेवण्यासाठी रोपांच्या भोवती चांगले आच्छादन घाला.

फुलकोबी कशी वाढवायची : फुलकोबीची लागवड घरात बियांपासून करता येते किंवा थेट जमिनीत पेरणी करता येते. या दोन्ही पद्धतींचा एकत्रित वापर केल्यास, जीवनसत्त्वसंपन्न बागेतील या अनमोल पिकाचे सलग पीक मिळण्याची खात्री करता येते. उन्हाळ्याच्या सुरुवातीला पीक मिळावे यासाठी, वसंत ऋतूतील शेवटच्या दंवाच्या सुमारे ६ आठवडे आधी घरामध्ये बिया लावा. शरद ऋतूतील किंवा हिवाळ्याच्या सुरुवातीचे पीक घेण्यासाठी, उन्हाळ्याच्या मध्यापासून ते अखेरपर्यंत थेट वाफ्यात बिया लावा. जर तुम्ही सौम्य हिवाळा असलेल्या प्रदेशात राहण्याइतके भाग्यवान असाल, तर तुम्ही हिवाळ्यातील पिकासाठी शरद ऋतूमध्ये देखील लागवड करू शकता.





## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३५ : अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.
१७७४ : ब्रिटीश कमांडर कर्नल चेम्पमेन यांनी रोहिलखंड येथील रोहिला सेनेचा पराभव करून रोहिलखंड आपल्या ताब्यात घेतले.
१८१८ : दोनशे युरोपियन व दोनशे एतद्देशीय शिपायांसह इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठविले. चैत्र व. ३
१८९१ : रुस देशाची राजधानी मास्को येथिल यहुदी धार्मिक लोकांना देशाबाहेर काढून देण्यात आले.
१९३५ : युरोपियन राष्ट्र पोल्ंड ने संविधान आमलात आणले.
१९८४ : वैज्ञानिकांनी एड्स या विषाणूचा शोध लावला.
१९९० : नामिबिया संयुक्त राष्ट्रांत प्रवेश होऊन तो १६० वा सदस्य देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : विल्यम शेक्सपियर, इंग्लिश साहित्यिक.
१५६४ : विल्यम शेक्सपिअर – इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ १९९५ पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २३ एप्रिल १६१६)
१७९१ : जेम्स बुकॅनन – अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ जून १८६८)
१८५८ : मॅक्स प्लँक – नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिक शास्त्रज्ञ (मृत्यू: ४ आक्टोबर १९४७)
१८५८ : पंडिता रमाबाई – विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (मृत्यू: ५ एप्रिल १९२२)
१८७३ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे – अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (मृत्यू: २ जानेवारी १९४४)
१८९७ : लेस्टर बी. पिअर्सन = कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २७ डिसेंबर १९७२)
१९२७ : हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका व सर्बहार वादक अन्नपूर्णा देवी यांचा जन्मदिन.
१९३८ : एस. जानकी – शास्त्रीय गायिका
२००५ : मी ॲट द झू हा पहिला व्हिडिओ युट्यूब वर प्रकाशित झाला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१६ : विल्यम शेक्सपिअर इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ
१९९५ : पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: २३ एप्रिल १५६४)
१८५० : विल्यम वर्डस्वर्थ – काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (जन्म: ७ एप्रिल १७७०)
१९२६ : हेन्री बी. गुप्पी – ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ (जन्म: २३ डिसेंबर १८५४)
१९५८ : शंकर श्रीकृष्ण देव – निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक (जन्म: १० आक्टोबर १८७१)
१९६८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय पटियाला घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक उस्ताद बडे गुलाम अली खान यांचे निधन.
१९७३ : हिंदी आणि ब्रजभाषेतील प्रख्यात कवी आणि लेखक धीरेंद्र वर्मा याचं निधन.
१९९२ : सत्यजित रे – ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारतरत्न. 'पथेर पांचाली' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला देशविदेशात अनेक गौरव मिळाले. त्यांना विशेष ऑस्कर पुरस्कारही देण्यात आला होता. (जन्म: २ मे १९२१)
२००० : मराठी चित्रपटांना आधार मिळावा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ४० वर्षे लालबागमधील 'भारतमाता' चित्रपटगृह चालवणारे यशवंत सदाशिव ऊर्फ बाबासाहेब भोपटकर यांचे निधन.
२००१ : जयंत श्रीधर तथा जयंतराव टिळक – संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक नेते, गोवा मुक्ती संग्रामातील एक झुंजार सेनापती, लोकमान्य टिळकांचे नातू, राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, तत्त्वज्ञान, विज्ञान, निसर्ग आणि शिकार इ. विविध क्षेत्रांमधे दीर्घकाळ सक्रिय असणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष व केसरीचे संपादक (जन्म: १२ आक्टोबर १९२१)
२०१३ : शमशाद बेगम – पार्श्वगायिका (जन्म: १४ एप्रिल १९१९).

## आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यावयाची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.



cmyk

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# साष्ट पिंपळगाव वाळू घाटांवर महसूल प्रशासनाचा छापा; अवैध वाळू साठा व केनी जप्त




अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मौजे साष्ट पिंपळगाव येथील वाळू घाट क्रमांक १ आणि २ वर आज (दि. २२ एप्रिल) महसूल प्रशासनाने अचानक धाड टाकून सविस्तर तपासणी केली. उपविभागीय दंडाधिकारी () श्री. उमाकांत पारधी आणि तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. या पाहणीत अत्याधुनिक ड्रोन कॅमेऱ्याचाही वापर करण्यात आला. तपासणीदरम्यान काही त्रुटी आढळून आल्या असून, नियम मोडणाऱ्यांवर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. तसेच, शेजारील बीड जिल्ह्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावरही कारवाई करत साहित्य नष्ट करण्यात आले आहे.

घाट क्रमांक २: प्रशासनाचे कडक निर्देश

दुपारी सव्वा दोन वाजता प्रशासनाच्या पथकाने साष्ट पिंपळगाव घाट क्र. २ ला ग्रामस्थांच्या (गणेश शिंदे, आप्पासाहेब शिंदे आदी) उपस्थितीत भेट दिली. परिस्थिती घाटावर २९ ते ३० वाळू वाहतूक करणारी वाहने (डंपर) उभी होती. मजुरांच्या साहाय्याने वाळू भरणे सुरू असल्याचे निदर्शनास आले. ईटीपी () जनरेट होत नसल्याने गाड्या थांबल्या होत्या. चौकशीअंती एमएसईबीचे काम सुरू असल्याने वीजपुरवठा आणि नेटवर्क खंडित झाल्याने ईटीपी जनरेट होण्यास अडचण येत असल्याचे निष्पन्न झाले. एका जाणाऱ्या वाहनाची तपासणी केली असता त्याची पावती वैध () आढळली.

उपस्थित वाहनांपैकी काही वाहनांवर नंबर प्लेट नव्हत्या. घाटावर जाण्यासाठी ३ रस्ते सुरू असल्याचे आढळले. ते तात्काळ बंद करण्यात आले. व त्याचा वापर करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आल्या. सदर ठिकाणी सीसीटीव्ही सुरू होते. प्रशासनाचे निर्देश तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी कंत्राटदाराचे प्रतिनिधी व गावकऱ्यांसमक्ष खालील सक्त सूचना दिल्या १) घाटात ये-जा करण्यासाठी केवळ एकाच अधिकृत रस्त्याचा वापर करावा, उर्वरित रस्ते तत्काळ बंद करावेत. नंबर प्लेट नसलेल्या कोणत्याही वाहनामध्ये वाळू भरू नये व त्यांना ईटीपी () देऊ नये. ३) यंत्राच्या साहाय्याने वाळू उपसा करण्यास सक्त मनाई आहे. वाळू उपसा केवळ सूर्योदय ते सूर्यास्त या वेळेतच करावा. रात्रीच्या वेळी वाहनांना घाटात प्रवेश देऊ नये. उन्हाचा कडाका पाहता मजुरांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. निविदेतील सर्व अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करावे. सदर ठिकाणी मजुराच्या साह्याने वाहने भरत असल्याचे स्पष्ट दिसून आले घाट क्रमांक १: ३० ते ३५ ब्रास वाळू साठा जप्त; बीड हद्दीतील अवैध उपशावर कारवाई दुपारी ४:०५ वाजता पथकाने घाट क्रमांक १ ची पाहणी केली. ईटीएस () मोजणी अहवाल अप्राप्त असल्याने हा घाट सध्या बंद आहे. अवैध वाळू साठा घाट परिसरात पाहणी केली असता अंदाजे ३० ते ३५ ब्रास वाळूचे ढिगारे (साठा) आढळून आले. हा साठा तत्काळ जप्त करण्याच्या सूचना मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना देण्यात आल्या असून स्वतंत्र पंचनामा करण्यात आला आहे. नदीपात्रापलीकडे कारवाई: साष्ट पिंपळगावच्या विरुद्ध बाजूस, नदीपात्रापलीकडे माकसपिंपळगाव (ता. गेवराई, जि. बीड) येथे अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. नदीच्या पलीकडे जाणे शक्य नसल्याने, अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उमाकांत पारधी व विजय चव्हाण तहसीलदार यांनी घटनास्थळी जाऊन पाण्यातून वाळू ओढणाऱ्या सुमारे १० ते १३ 'केन्यांचे' (/) दोर कापून टाकले. यापैकी ७ केन्या व इतर साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले आहे. संबंधित घाटधारकांना सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांच्या घाटाच्या परिसरात अवैध उत्खनन निदर्शनास आल्यास तत्काळ पुराव्यासह प्रशासनाला कळवावे. या अचानक केलेल्या तपासणीमुळे महसूल प्रशासन अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर करडी नजर ठेवून असल्याचे स्पष्ट झाले आहे. ग्रामस्थांनी महसूल प्रशासनाच्या या पारदर्शक व धडक कारवाईबाबत समाधान व्यक्त केले आहे. दोन्ही ठिकाणी उपस्थित मजुरांना विचारणा केली असता त्यांनी मजुराद्वारेच वाहने भरत असल्याचे समक्ष सांगितलं

# हातभट्टीच्या अड्डयावर छापा एक लाखाचा मुद्देमाल जप्त



परतुर। प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, अजय कुमार बंसल यांनी अवैध धंदयावर कार्यवाही करणे बाबत परतुर पोलिसांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.एस. बी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे अवैध धंदयावर कार्यवाही करण्यासाठी वेगवेगळे पथक नेमलेले आहे.

त्यावरुन दिनांक २०/०४/२०२६ रोजी मौजे गोसावी पांगरी येथील अवैधरित्या विक्री करणा-या हातभट्टीच्या एकुण (०३) ठिकाणी व मौजे वरफळ येथे (०१) ठिकाणी कार्यवाही करुन हातभट्टी दारु व सडवा एकुण ४६५ लीटर किंमती १,०२,४००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त व उध्दवस्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बसंल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक श्री.एस.बी. भागवत, श्री. नंदु खंदारे पोउपनि, अंमलदार अशोक गाढवे, देविदास जाधव, राम पारवे, सुनिल इलग, महेश कोरडे, प्रशांत काळे, राम हाडे, विजय जाधव, अमोल गायकवाड, नितीन बोंडारे यांनी केलेली आहे.

# अंधश्रद्धेच्या बेड्या व सामाजिक प्रबोधन सालबर्डी चित्रपटाचे सर्वत्र स्वागत



पाथर्डी । प्रतिनिधी

मोहटादेवी गडाचे स्थान अत्यंत जागृत असून निसर्ग पर्यटन व धार्मिक दृष्ट्या सुद्धा अतिशय उत्तम असलेल्या परिसरात आगामी मालिका अथवा मराठी चित्रपटाचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न करू ''सालबर्डी'' चित्रपट अलीकडील काळात प्रसारित झालेल्या दर्जेदार मराठी चित्रपटांच्या तोडीचा असून मोहटादेवीच्या कृपेने प्रेक्षकांच्या पसंतीस निश्चित उतरेल असा विश्वास या चित्रपटाचे दिग्दर्शक रमेश चौधरी यांनी व्यक्त केला चित्रपटाचे कथानक जिल्ह्यातील चांदाबाल हत्याकांडावर आधारित आहे.

अंधश्रद्धा भोंदूगिरी या विरुद्ध आवाज उठवत समाजप्रबोधनाचा संदेश देणारी चित्रपटाचे कथानक अतिशय दर्जेदार आहे वलयांकित कलाकार उत्तम दिग्दर्शन व सादरीकरणामुळे आठ दिवसातच राज्यात सर्वत्र या चित्रपटाचे जोरदार स्वागत झाले बीड जिल्ह्यातील दौरा आटोपून पुण्याकडे जाताना ''सालबर्डीच्या'' टीमने मोहटा देवीचे दर्शन घेत भाविकांच्या माहितीसाठी पोस्टर प्रदर्शन करत भाविकांशी संवाद साधला यावेळी चित्रपटाचे निर्माते अनिल देवढे राम जाधव दिग्दर्शक रमेश चौधरी कलाकार कमलाकर सातपुते अनिल नगरकर व रोहित कोकाटे यांनी देवीची महापूजा केली.

यावेळी पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता अशोक खेडकर जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रतीक खेडकर देवस्थान समितीचे विश्वस्त बाळासाहेब लाहोटी व अशोक खेडकर पंचायत समिती कृषी विभागाचे कर्मचारी ओमप्रकाश दहिफळे देवस्थान समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे मुख्य लेखाधिकारी संदीप घुले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते

यावेळी चर्चा करताना कमलाकर सातपुते म्हणाले मोहटा देवीचे मंदिर अतिशय भव्य व अत्यंत स्वच्छता मनाला प्रसन्न करणारी आहे येथे भरपूर चैतन्य शक्ती ओतप्रोत भरलेली आहे देवीचे स्थान अत्यंत जागृत असल्याची अनुभूती सुद्धा लगेचच येते मागील आठवड्यात वितरित झालेल्या ''सालबर्डी'' चित्रपटाला रसिकांचे भरभरून प्रेम मिळत आहे.

# जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे




जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील बालाजी चौक येथे चर्मकार समाजाच्या वतीने ''बालाजी चौक'' या चौकास जगदुरु श्री संत रोहिदास महाराज यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी दि. १५ एप्रिल २०२६ पासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, संबंधित चौकाचे ''बालाजी चौक'' असे नामकरण करण्याचा ठराव तत्कालीन नगर परिषदेकडून यापूर्वीच मंजूर झालेला असल्याने, त्याच चौकास दुसरे नाव देणे शक्य नाही. यावेळी उपोषणकर्त्यांनी जालना शहरातील अन्य योग्य ठिकाणी संत रोहिदास महाराज यांच्या नावाने चौक नामकरण करून स्मारक उभारण्याबाबत मागणी केली.

भास्कर आबा दानवे यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा करत पुढील महानगरपालिका च्या सर्वसाधारण सभेत संत रोहिदास महाराज यांच्या नावाने योग्य ठिकाण निश्चित करून निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले व उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले व जगद्गुरु श्री संत रोहिदास महाराज समितीचे अशोक भगुरे, योगेश बिल्लोरे, विकास बिल्लोरे, दिनेश लामकाने, संतोष कुरील व विनोद आक्से यांना भास्कर आबा दानवे यांनी पाणी प्राशन करून उपोषण सोडविले.या प्रसंगी भाजपा गटनेते महेश निकम, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, जीवन सले, अजित मानधानी, कल्याण भदनेकर, रणजीतसिंग मोहिने तसेच शहर अभियंता सौद आदी उपस्थित होते.

# 'रायझिंग जालना पालकमंत्री यांच्या हस्ते' सोहळ्याचे आयोजन

जालना। प्रतिनिधी

येणाऱ्या १ मे रोजी जालना जिल्हा स्थापनेला ४५ वर्ष पुर्ण होत आहे. या अनुषंगाने जालना जिल्हा प्रशासनामार्फत 'रायझिंग जालना' हा सोहळा साजरा करण्यात येणार आहे. 'रायझिंग जालना' सोहळ्याचे आयोजन जालना शहरातील अग्रसेन भवन येथे करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री जिल्यायाच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

'रायझिंग जालना' सोहळ्यामध्ये जालना जिल्ह्याच्या मागील ४५ वर्षांच्या वाटचाली अनुषंगाने आयोजित प्रदर्शनी मध्ये जालना जिल्ह्याच्या विशेष बाबींवर भर देण्यात येणार आहे. तसेच विविध विभागांचे उल्लेखनीय काम स्टॉलच्या माध्यमातून दाखवण्यात येणार असुन, यात विविध बचत गटांच्या स्टॉलचा देखील समावेश राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने हज यात्रेकरूंना शुभेच्छा



मंठा। प्रतिनिधी

तालुक्यातील हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लिम बांधवांना (ता.२२) बुधवार रोजी येथील जामा मज्जित मरकस येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शाल,हार देऊन हज यात्रेस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी हजयात्रेस जाणाऱ्या यात्रेकरूंना मौलाना हाजी नसीमुद्दीन यांनी यात्रे दरम्यान येणाऱ्या अडीअडचणी बाबत सखोल मार्गदर्शन केले.या प्रसंगी बाजार समितीचे उपसभापती गोपाळराव बोराडे, मौलाना हाजी जब्बार, सचिव रमेश बोराडे, बालासाहेब कुलकर्णी, इरफान हाजी, लाला खासाब, अंकुशराव बोराडे, विजयकुमार देशमुख, कयूमभाई कुरेशी, मुसाभाई कुरेशी, शबाबभाई कुरेशी, मुस्ताक अन्सारी, शेख उमरभाई, शेख रहीम, शेख वाजेद, अनिकेत चव्हाण यांची उपस्थिती होती.

यावेळी हजयात्रेसाठी शेख आवेश, बाजखा पठाण, शिराजखा पठाण,सय्यद अजीस,जब्बार कुरेशी, मोहम्मद कुरेशी,खालीद कुरेशी,सय्यद मुस्तफा,सय्यद अब्दुल रहमान,मुजेद बागवान,अबेद बागवान,फारुख बागवान, सय्यद लाल,सहीराज बागवान,सय्यद मुखीद यांना सभापती ए.जे.बोराडे यांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

# निसंतान दाम्पत्याला १८ वर्षानंतर अपत्यप्राप्ती

## आई टेस्ट ट्युब बेबी सेंटर आणी असोसिएट पार्टनर यांच्या प्रयत्नाला यश




बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील पहिले ग्रुप टेस्ट ट्युब बेबी सेंटर, बीड येथील आई हॉस्पिटलमध्ये सुरू झाले आहे... या आयव्हीएफ सेंटरचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे येथे मराठवाड्यातील तज्ञ अशा २२ अनुभवी डॉक्टरांची टीम आहे... एवढ्या साऱ्या तज्ञ डॉक्टरांनी एकत्रीत येत हे आई हॉस्पिटल येथे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पुणे येथील आयवीएफ मधील तज्ञ डॉक्टरांची टीम असलेले आयव्हीएफ सेंटर सुरू केले आहे... आई हॉस्टिटल मधील या सेंटर येथे अक्षय तृतीयाच्या शुभ महुर्तावर पहिल्या टेस्ट ट्युब बेबीचा जन्म झाला... विशेष म्हणजे कोणत्याही अडचणी शिवाय ९ महिन्यानंतर मातेने अतिशय गोंडस बाळाला जन्म दिला... बाळ आणि माता सुखरूप आहेत... आई हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टरांच्या टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अलीकडच्या काळात वैद्यकीय उपचाराच्या बाबतीत बीडमध्ये क्रांती झाली आहे... कधी काळी मोठ्या शहरात असलेल्या आयवीएफ सारख्या अत्याधुनिक उपचाराच्या सोय- सुविधा बीडमध्ये आल्या आहेत... ४ जुलै २०२५ रोजी बीड येथे वैद्यकीय उपचाराच्या बाबतीत क्रांती करणारे अत्याधुनिक सोय- सुविधांनी सुसज्ज असे पहिले ग्रुप टेस्ट ट्युब बेबी सेंटर सुरू झाले. या सेंटरची खासियत म्हणजे २२ अनुभवी आणि पुणे येथील तज्ञ डॉक्टरांनी एकत्र येऊन समाजातील वंध्यत्वाच्या समस्येवर मात करण्यासाठी आई हॉस्पिटल येथे टेस्ट ट्युब बेबी सेंटर सुरू केले.. या सेंटरच्या माध्यमातून बीड व आजूबाजूच्या तालुक्यातील २२ स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर एकत्र आले. यामागे एकच उद्देश आणि प्रामाणिक ध्येय होते,

### पहिल्याच दिवशी रुग्णसेवा

तब्बल २२ स्त्रीरोग तज्ञांनी एकत्र येत आई ग्रुप आयव्हीएफ सेंटर सुरू केले... विशेष बाब म्हणजे सेंटरच्या उद्घाटनाच्या दिवशीच ४ जुलै २०२५ रोजी पहिले निसंतान दाम्पत्य ,१८ वर्ष लग्नाला झालेले दांपत्य आई आयव्हीएफ सेंटमध्ये आले... २२ तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली सबंधित रुग्णावर यशस्वी सुरुवात करण्यात आले. त्याच पेशंटची पुढील ९ महिन्यांत यशस्वी प्रसुती झाली... ही गोष्ट आई आयव्हीएफ सेंटरच्या तत्परतेची आणि प्रगत तंत्रज्ञानाची साक्ष बनली आहे.

### टेस्ट ट्युब बेबीचा इतिहास

जगातील पहिले टेस्ट ट्युब बेबी १९७८ साली जन्माला आले... जन्मलेल्या बाळाचे नाव लुवाईस ब्राऊन असे होते... भारतात देखील पहिले टेस्ट ट्युब बेबी १९७८ मध्ये जन्माला आले... बाळाचे नाव दुर्गा (कानुप्रीया अग्रवाल) आहे. मराठवाड्यातील पहिल्या ग्रुप आयवीएफ सेंटरमध्ये १९ एप्रील २०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ दिनी टेस्ट ट्युब बेबीचा जन्म झाला... खरेतर, कोणत्याही सेंटरसाठी टेक बेबी होम रेट एक ते दिड वर्षाचा असतो. परंतु, आई आयव्हीएफ सेंटरला हे यश केवळ ९ महिन्यांत मिळालं... यावरूनच या सेंटरमधी तज्ञ डॉक्टर अन्? अत्याधुनिक तंत्रज्ञाची प्रचिती येते...

### मराठवाड्यातील हजारो निसंतान दाम्पत्यांना आशेचा नवा किरण

सेंटर सुरू झाल्याच्या अगदी नऊ महिन्यांनी पहिल्या बेबीचा सुखरूप जन्म हा क्षण आई ग्रुप टेस्ट ट्युब बेबी सेंटर टीमसाठी भावनिक तितकाच आनंदाचा क्षण आहे... २२ तज्ञ डॉक्टरांनी एकत्रीत येत पाहीलेले स्वप्न काळजी, दक्षता, योग्य उपचार आणि अत्याधुनिक तंत्रनाचा परिपाक

बीड जिल्हा व परिसरातील निसंतान दाम्पत्यांचे आई-बाबा होण्याचं स्वप्न साकार करणे... एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या या तज्ञ डॉक्टरांनी बीड जिल्हा व परिसरातील रूग्णांना आई ग्रुप टेस्ट ट्युब बेबी सेंटरच्या माध्यमातून मुंबई- पुणे अशा मोठ्या शहरातील प्रगत आणि मोठ्या हॉस्पिटल सारख्या सोय- सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. २२ तज्ञ डॉक्टरांचा अनुभव, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रूग्ण सेवेतील समर्पणामुळे हे आई टेस्ट ट्युब बेबी सेंटर मराठवाड्यातील एक विश्वासार्ह नाव बनत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ | ६

# दिशा समितीच्या मॅरोथॉन बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांनी २७ विभागाचा घेतला आढावा

बीड | प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या कोट्यवधींच्या निधीतून राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचवताना यंत्रणा सुस्त का?, जलजीवन मिशन योजना राबवूनही गावे तहाणलेली आहेत. रस्त्याची अवस्था वाईटच का?, मार्च २०२६ संपला तरी अनेक योजनांचे लक्ष्य अपूर्ण का?, अशा प्रश्नांची सरबत्ती करत खा.बजरंग सोनवणे यांनी गुरुवारी प्रशासकीय यंत्रणेचे अक्षरशः वाभाडे काढले. जनतेच्या पैशाचा योग्य विनीयोग व्हावा, कामात कुचराई कराल, तर याद राखा, विकासकामांचा खेळखंडोबा खपवून घेतला जाणार नाही, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

जल्हिाधिकारी कार्यालयात आयोजित जल्हिा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर समितीचे सचिव तथा जल्हिाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, निवासी उपजल्हिाधिकारी शिवकुमार स्वामी, मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. दिशा समितीच्या बैठकीत रस्ते व पाणीपुरवठा कामांवर सर्वाधिक चर्चा करण्यात आली.



यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जलजीवन मिशन आणि पेयजल व स्वच्छता विभागाच्या कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी येत असून, अनेक ठिकाणी नळ योजना केवळ कागदावरच आहेत. रस्ते खोदून ठेवले आहेत पण पाणी मिळत नाही, यावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाच्या कामांच्या दर्जाबाबत त्यांनी अभियंत्यांना धारेवर धरले. नगर परिषद प्रशासन आणि प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत पात्र लाभार्थी असूनही त्यांना घरांचे हप्ते का मिळत नाहीत? घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कान त्यांनी टोचले. मनरेगा अंतर्गत मजुरांचे पेमेंट वेळेवर का होत नाही? मजुरांना कामापासून वंचित ठेवले जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. महाऊर्जा (पी.एम. सूर्यघर) योजनेत जल्हिाचा टक्का राज्यातील इतर जल्हिांच्या तुलनेत निचांकी का आहे, असा सवाल करत सदरील काम वाढवावे, ग्रामीण भागात जनजागृती करावी, असेही खा.सोनवणे म्हणाले.

### आरोग्य केंद्रात औषधे उपलब्ध हवेतच

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा निधी परत जाता कामा नये, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे उपलब्ध राहिलीच पाहिजेत. शिक्षण मंत्रालय आणि महिला व बालविकास विभागाने कुपोषण नर्मिूलनावर केवळ एसी हॉलमध्ये चर्चा न करता प्रत्यक्ष वाड्या-वस्त्यांवर जाऊन कृती करावी, असे बजावले.

## शासकीय निधीतून बोगस व कागदोपत्री कामे दाखवून २५ लाखांची अफरातफर करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

माजलगाव | प्रतिनिधी

तालुक्यातील फुलेपिंपळगाव ग्रामपंचायतचे दोन ग्राम सेवक, सरपंच,उपसरपं,पं.स.अभियंता यांनी संगनमत करुन विविध प्रकारच्या विकास कामांसाठी शासकीय निधीतून बोगस व कागदोपत्री कामे दाखवून २५ लाख रुपयांची अफरातफर केली आहे याबाबत सर्व कामांची चौकशी करून ग्रामसेवक, अभियंता विरोधात गुन्हे व सरपंच,उपसरपं वर अपत्रातेची कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मनोज साळवे यांनी २३ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. सामाजिक कार्यकर्ते मनोज साळवे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात विविध प्रकारच्या विकास कामांसाठी शासना कडून २०२२-२३ ते २०२४- २५,२०२६ प्राप्त निधीची तपशीलवार माहिती देण्यात आली ती पुढिल प्रमाणे आहे.

गायकवाड गल्लीत सोलार पॅनल बसवणे ६ लाख ६४ हजार,३३३ रुपये,नालीवर पुल बांधकाम करणे ७० हजार,७६४रु.,जी.पी.फुलेपिंपळगाव आपले सरकार मानधन १ लाख ५० हजार,९२९, अंगणवाडी साहित्य खरेदीसाठी ८० हजार, सांडपाण्याचे व्यवस्थापन व निचरा वाहिनी निर्मितीसाठी ५ लाख,३३ हजार,२३८ रु.

जि.प.शाळेवर सोलार पॅनल बसवणे १ लाख,८७ हजार ,६०५ रु. जि.प.शाळा बांधकाम करणे ४ लाख रुपये, पथदिवे बसवणे ३० हजार,७०४, महिला व बालविकास विभाग ४० हजार रुपये.

सिमेंट बाकडे बसविणे ९५ हजार ७३४,गावा अंतर्गत बंदीस्त नाली बांधकाम २ लाख ९९ हजार,९९९ रु, गावात पेव्हर ब्लॉक बसविणे २लाख ७२ हजार ५९०रु,बौद्ध समाज मंदिरा समोर सिमेंट रस्ता तयार करणे २ लाख ५० हजार, पिण्याच्या पाण्याचा नवीन स्त्रोत ६ लाख ५३ हजार २३८ रुपये.

असा एकुण ३७ लाख २९ हजार,१३४ रुपयांचा निधी शासनाकडून प्राप्त झाला होता यात ग्रामसेवक सुरेश वाघमारे व ग्रामसेवक आनंद कुमार सिरसट, सरपंच राहुल फुलगे,पं.स.अभियंता पान ३ वर

## ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे आज बीड नगरीत होणार आगमन!

बीड | प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडे वाडा येथे सुरु केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेच्या भिडेवाडा चित्ररथाचे आज शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन होणार आहे.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या पुढाकारातून व समता परिषदेचे कार्याध्यक्ष मा. खासदार समीरभाऊ भुजबळ व आमदार पंकज भाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून ''भिडेवाडा



भारतातील पहिली मुलींची शाळा'' या ऐतिहासिक वारशाचा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचवण्याचे अतिशय प्रेरणादायी कार्य सुरू आहे.

हा रथ म्हणजे केवळ एक प्रतिकृती नाही, तर शिक्षण, समता आणि सामाजिक जागृतीचा दीप आहे. मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला, त्या महान कार्याची आठवण करून देणारा जिवंत प्रेरणा स्तोत्र आहे.

या पार्श्वभूमीवर बीड शहरात आज शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता या चित्ररथाचे आगमन होत असून महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष भाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत यांच्या नियोजनात या चित्ररथाचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. बीड नगरीतील शिव - फुले - शाहू - आंबेडकर चळवळीतील समाज बांधवांनी या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित पान ३ वर

## घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर थांबवा; प्रहार जनशक्ती पक्षाचा इशारा

माजलगाव | प्रतिनिधी

शहरातील विविध हॉटेल्स आणि धाब्यांवर घरगुती एलपीजी () गॅस सिलिंडरचा सर्रासपणे बेकायदेशीर व्यावसायिक वापर होत असल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाने केला आहे. याबाबत प्रहार पक्षाच्या वतीने तहसील प्रशासनाला देण्यात आले असून, तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

माजलगाव शहरातील अनेक हॉटेल्स आणि धाब्यांवर घरगुती वापराचे सिलिंडर वापरले जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. हा प्रकार अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ आणि एलपीजी (पुरवठा आणि वितरण नियमन) आदेश २००० चे उल्लंघन करणारा आहे.या बेकायदेशीर वापरामुळे सर्वसामान्य ग्राहकांना वेळेवर गॅस मिळत नाही. शहरात सिलिंडरची कृत्रिम टंचाई निर्माण होत असून गॅस एजन्सीच्या वितरण प्रणालीतही अनियमितता दिसून येत आहे. याचा मोठा फटका सर्वसामान्य गृहिणींना बसत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.माजलगाव प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख गोपाळ पैंजणे व विजय जोगडे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, येत्या दोन दिवसांत संबंधित हॉटेलवर छापेमारी करून कारवाई करावी आणि दोषींवर गुन्हे दाखल करावेत. अन्यथा, हा प्रश्न जिल्हाधिकारी आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे नेला जाईल, असा पवित्रा पक्षाने घेतला आहे.

या निवेदनामुळे माजलगावमधील गॅस काळा बाजारीचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आता प्रशासन काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिक्षणाधिकारी मोरे यांनी घेतला पदभार



बीड | प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे प्रभारी शिक्षणाधिकारी कुवर मॅडम यांच्या ठिकाणी शासनाने नवनियुक्त केलेले शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे यांनी आज बुधवार घेतला त्यांचे स्वागत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले

आज . मयुरेश मोरे यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड या पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड व डॉ. किरण कुंवर, शिक्षणाधिकारी (योजना) हे उपस्थित पान ३ वर

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहाय्यातून ३० गुंठ्यांत सव्वातीन लाखांचे उत्पन्न!

### लिंबू शेतीतून डिगंबर गडदे यांचा यशस्वी प्रयोग

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वाघाळा येथील शेतकरी डिगंबर जिजाराम गडदे यांनी अल्पभूधारक असूनही आधुनिक पद्धतींचा अवलंब करत लिंबू शेतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. केवळ १ एकर शेती असलेल्या गडदे यांनी २०१९ साली ३० गुंठे जमिनीत १०० लिंबूची रोपे लावून शेतीत नवा प्रयोग सुरू केला. या लिंबू बागेला लागवडीपासून अवघ्या २७ महिन्यांत फळधारणा सुरू झाली. ग्लोबल विकास ट्रस्टचे सुयोग्य मार्गदर्शन आणि गडदे यांनी




केलेल्या नियोजनामुळे चालू वर्षात त्यांनी सुमारे ९ क्विंटल लिंबू उत्पादन घेतले आहे. सध्या बाजारात लिंबाला १२५ रुपये प्रति किलोपर्यंत भाव मिळत असला तरी, कधी कधी हा दर १० रुपयांपर्यंत घसरतो. अशा चढ-उतारांमध्येही गडदे यांना सरासरी ४० रुपये प्रति किलो दर मिळाला.

लिंबू लागवडीतूनआतापर्यंत त्यांनी सुमारे ३.२५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे, या शेतीसाठी त्यांचा एकूण खर्च केवळ १० हजार रुपयांच्या आसपास राहिला आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून त्यांना लिंबूची रोपे आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाले. याबाबत बोलताना गडदे म्हणाले, ''मयंक गांधी सरांच्या प्रेरणेतून आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या मदतीमुळे मला हे यश मिळाले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.'' सध्या उर्वरित जमिनीतही लिंबू लागवड वाढवण्याचा त्यांचा मानस असून, कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारी ही शेती पद्धत इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## सरकारी शाळा टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची -ॲड. कवठेकर

### श्रीमती छाया मुरलीधर भोंडवे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

पाटोदा | प्रतिनिधी

डोमरी केंद्र अंतर्गत तिरमलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती छाया मुरलीधर भोंडवे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला गावातील नागरिक, शिक्षकवर्ग व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच श्रीमती मंदा विठ्ठल जगताप होत्या.




प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदचे माजी सदस्य ॲड. प्रकाशदादा कवठेकर, भाजपाचे गणप्रमुख राजेभाऊ भोंडवे, माजी उपसरपंच दादाराव जगताप तसेच माजी पतसंस्था अध्यक्ष नागरगोजे सर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. प्रकाशदादा कवठेकर म्हणाले की, ''सरकारी शाळा टिकवण्याची जबाबदारी केवळ शिक्षकांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.'' त्यांनी श्रीमती भोंडवे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते श्रीमती छाया भोंडवे यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार पान ३ वर

## बीड येथे आंबेडकरी मातंग समाज परिषदेचे आयोजन; सामाजिक-राजकीय प्रश्नांवर होणार सखोल मंथन

माजलगाव | प्रतिनिधी

बहुजन क्रांती मोर्चा व लसाकम यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे आंबेडकरी मातंग समाज परिषदेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी नगर येथील अस्मिता फंक्शन हॉलमध्ये ही परिषद पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या परिषदेकडे जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजाचे लक्ष लागले असून मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



या परिषदेमध्ये बीड जिल्ह्यातील आंबेडकरी मातंग समाजाचे फुले, शाहू,आंबेडकर यांच्या चळवळीतले ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात येणार आहे. तसेच सध्याची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, समाजासमोरील विविध प्रश्न आणि येणाऱ्या काळातील आव्हाने यावर सखोल विचारमंथन होणार आहे. बदलत्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात मातंग समाजाची भूमिका काय असावी, यावरही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

परिषदेमध्ये विशेषतः मातंग समाजावर पडत असलेल्या विविध वैचारिक प्रभावांचा आढावा घेत, समाजाला फुले,शाहू,आंबेडकर विचारसरणीच्या अधिष्ठानावर एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. समाजातील तरुण पिढीने शिक्षण, संघटन व संघर्ष या तत्वांवर पुढे येत नेतृत्व घ्यावे, यासाठीही प्रेरणादायी मार्गदर्शन केले जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

या परिषदेसाठी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून आठवले गटाचे राज्य युवक अध्यक्ष पप्पूजी कागदे, डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैया चांदणे हे प्रमुख पाहुणे म्हणून पान ३ वर


## माजलगांवात महावितरणचा भोंगळ कारभार १४ तास वीजपुरवठा खंडित, नागरिक संतप्त

माजलगांव | प्रतिनिधी

शहरातील वीज पुरवठ्याबाबत महावितरणच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील एका भागातील झाडतोडीच्या कामासाठी तब्बल १४ तास संपूर्ण माजलगांव शहराचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने नागरिकांना दिवसभर मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित काम केवळ एका परिसरात सुरू असताना संपूर्ण शहराचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला. त्यामुळे व्यापारी, शेतकरी, लघुउद्योग तसेच विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. उष्णतेच्या तीव्रतेमुळे घरगुती वापरकर्त्यांनाही त्रास सहन करावा लागला.

नागरिकांनी सांगितले की, मागील वर्षी पावसाळ्यातही महावितरणकडून अशाच प्रकारे वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. एका महिन्यात तब्बल आठ दिवस, आठवड्यातून दोन दिवस वीजपुरवठा बंद ठेवण्याची



वेळ आली होती. त्यामुळे नागरिकांचा संयम आता सुटत चालला आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीचे अभियंता चौधरी यांच्या कार्यकाळात अशा प्रकारचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत नव्हता. ज्या भागात काम सुरू असेल, त्या भागापुरताच वीजपुरवठा मर्यादित ठेवण्याची पद्धत त्यांनी अवलंबली होती. मात्र सध्या ही पद्धत न वापरता संपूर्ण शहराचा वीजपुरवठा बंद केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकारामुळे रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पान ३ वर

## न्यु व्हिजन पब्लिक स्कूल येथे दहावीतील गुणवंतांचे कौतुक

अंबाजोगाई | प्रतिनिधी

केंद्रिय शिक्षण मंडळ अर्थात सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन तर्फे फेब्रुवारी आणि मार्च-२०२६ महिन्यांत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यु व्हिजन पब्लिक स्कूलने दहावी सी.बी.एस.ई बोर्ड (इंग्रजी माध्यम) परीक्षेत सलग १६ व्या वर्षीही १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचे परीक्षेसाठी बसलेले सर्वच्या सर्व ९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



दहावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या शिक्षकांचे अभिनंदन व कौतुक संस्थेच्या वतीने आयोजित एका विशेष समारंभात करण्यात आले.

बुधवार, दिनांक २२ एप्रिल रोजी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणेकरांसाठी म्हाडाची गुडन्यूज, २९५ घरांसाठीच्या लॉटरीची तारीख ठरली ; प्रथम येणाऱ्यास प्राधान्य, टू बीएचके घेण्याची संधी

पुणे । प्रतिनिधी

म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अखत्यारीतील विविध वसाहतींमधील २९५ सदनिका प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत असून, यासाठी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया ४ मे २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेपासून सुरू होणार आहे. पुणे मंडळामार्फत २० टक्के सर्वसमावेशक व १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनांतील विक्री अभावी शिल्लक राहिलेल्या २९५ सदनिका 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' योजनेमध्ये समावेश करण्यात आला असून पुणे महानगरपालिका म्हाडा योजनेंतर्गत ११३ सदनिका व पिंपरी चिंचवड म्हाडा योजनेंतर्गत १८२ सदनिकांचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत पुणे महानगरपालिका क्षेत्रातील तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील विविध गृहनिर्माण योजनांमधील वनआरके, वन बीएचके व टू बीएचके प्रकारातील सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चिखली, ताथवडे, वाकड, लोहगाव, मुंढवा, येवलेवाडी, वाघोली, किवळे, फुरसुंगी, डुडुळगाव, पिसोळी, बालेवाडी, हडपसर, पुनावळे आदी परिसरांतील प्रकल्पांचा या योजनेत समावेश आहे. विविध प्रकल्पांमध्ये भिन्न क्षेत्रफळ, किंमत व सुविधा उपलब्ध असल्याने अर्जदारांना त्यांच्या गरजेनुसार पर्याय निवडण्याची संधी मिळणार आहे. पुणे मंडळातर्फे इच्छुक अर्जदारांना आवाहन करण्यात येत आहे की प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेंतील सदनिकांची माहिती व योजनेत सहभागी होण्याकरिताचे मार्गदर्शन करणारी माहिती पुस्तिका म्हाडाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येणार आहे. या पुस्तिकेचे अवलोकन करूनच योजनेत सहभाग घेण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. तसेच अर्जदारांनी याच संकेतस्थळावरून अर्ज नोंदणी करावयाची आहे. अर्ज नोंदणी झाल्यानंतरच ऑनलाइन अर्ज सादर करणे,




अनामत रक्कम भरणे,अर्ज शुल्क भरणा,योजना/ सदनिका निश्चिती करणे, ही प्रक्रिया ४ मे रोजी सकाळी ११.३० वाजेपासून कार्यान्वित होणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार अर्जदारांना उपलब्ध सदनिकांमधून तत्काळ निवड करण्याची सुविधा उपलब्ध असेल. सदनिका निश्चिती केल्यानंतर ४८ तासांच्या आत अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १० टक्के रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे. ही रक्कम म्हाडाकडे प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच अर्जदारास ऑनलाईन पद्धतीने सदनिकेची रक्कम भरून घेण्यासाठी तात्पुरते देकार पत्र देण्यात येईल. निर्धारित कालावधीत भरणा न केल्यास संबंधित सदनिकेवरील हक्क आपोआप रद्द होऊन ती पुढील अर्जदारासाठी उपलब्ध होईल. अनामत रकमेचा परतावा केवळ नियमांनुसारच करण्यात येईल व त्यावर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. अल्प उत्पन्न गट तसेच आर्थिक दुर्बल घटक अर्जदारांसाठी अनामत रक्कम रु. २०,०००/- निश्चित करण्यात आली आहे. अर्ज फी रु. ६००/- असून त्यावर जीएसटी (रु. १०८/-) आकारला जाईल. त्यामुळे अर्जाच्या वेळी एकूण रु. २०,७०८/- इतका प्रारंभिक भरणा आवश्यक राहील. पात्रतेच्या अटींनुसार अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. अर्जदार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा किंवा मागील २० वर्षांपैकी किमान १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्यास असावा. आर्थिक वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा (आयकर विवरणपत्र किंवा तहसीलदार दाखला) सादर करणे बंधनकारक राहील. अर्ज करताना अर्जदाराने स्वतःच्या बँक खात्याचा क्रमांक व आयएफएससी कोड अचूक नमूद करणे आवश्यक असून अनामत रकमेचा परतावा त्याच खात्यावर करण्यात येईल. सदर प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन व संगणकीय प्रणालीद्वारे राबविण्यात येत असून कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप राहणार नाही. म्हाडाने कोणत्याही एजंट किंवा मध्यस्थांची नेमणूक केलेली नाही. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनांना बळी पडू नये व केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार ई-मेल, एसएमएस व अर्जदाराच्या लॉगिनद्वारेच करण्यात येणार असल्यामुळे अर्जदारांनी आपला मोबाईल क्रमांक व ई-मे आयडी अचूक व सक्रिय ठेवणे आवश्यक आहे.योजनेअंतर्गत उपलब्ध सदनिकांवर प्रलंबित असलेले मालमत्ता कर, देखभाल शुल्क व इतर देयके संबंधित लाभार्थ्याने अदा करणे आवश्यक राहील. यशस्वी अर्जदारांनी संबंधित गृहनिर्माण संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील. देकारपत्र निर्गमित झाल्यानंतर अर्जदाराने परतावा मागितल्यास सदनिकेच्या किमतीच्या १ टक्के रक्कम कपात करून उर्वरित रक्कम विना व्याज परत करण्यात येईल. अधिक माहितीसाठी इच्छुक अर्जदारांनी म्हाडा लॉटरी मदत केंद्र, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, तळमजला, आगरकर नगर, यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ७० हजार रुपयांच्या वादातून तरुणाला संपवलं, पुण्यातील हत्या प्रकरणाचा उलगडा, दोन आरोपींना अटक

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील डेक्कन नदीपात्रात तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन संपवल्याची घटना घडली होती. या घटनेमागचे कारण काय? आणि आरोपी कोण हे समजू शकले नव्हते. कृषल कसबे (वय ३३, रा. महात्मा फुले पेठ) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अखेर आज या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आलं आहे. पैशांच्या वादातून हा खून झाल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. ओंकार कांबळे (वय २७, रा. धनकवडी, पर्वती) असे मुख्य आरोपीचे नाव



आहे. तर कृषल कसबे (वय ४२, रा. गंजपेठ) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

डेक्कन येथे गाडगीळ पूल (झेड ब्रिज) आणि छत्रपती संभाजी पुलादरम्यान नदीपात्रातील मोकळ्या जागेत १९ एप्रिलला सकाळी साडेसातच्या सुमारास कसबे यांचा मृतदेह आढळून आला होता. शस्त्राने गळा चिरल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. डेक्कन पोलिसात गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखा आणि डेक्कन पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. त्यात कांबळे याची दुचाकी हडपसरमध्ये आढळून आली आहे. दुचाकीवर रक्ताचे डाग आढळले आहेत. तसेच डिकीत तीन मोबाइलही सापडले आहेत. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी अंगावरील कपडेही बदलल्याचे निष्पन्न झाले आहे. चौकशीत आर्थिक व्यवहारातून वाद निर्माण झाल्याचे समोर आले आहे. कांबळे याने कसबे याच्याकडून घेतलेले ७० हजार रुपयांची परतफेड केली नव्हती. यावरून दोघांमध्ये वाद झाला. घटनेच्या दिवशीही त्यांची भेट झाली. त्या वेळी वादातून शस्त्राने गळा चिरून खून करण्यात आला. त्यानंतर आरोपी पसार झाले होते. अधिक तपास डेक्कन पोलिस करत आहेत. गंज पेठ येथील रहिवासी कृषल कसबे (वय ४२) यांचा मृतदेह रविवारी नदीपात्राजवळील मोकळ्या जागेत आढळून आला होता. धारदार चाकूने गळा चिरून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. याप्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता.


## पुण्याच्या नामांकित महाविद्यालयातील ५५ वर्षीय क्रीडा शिक्षिकेची १७ लाखांची फसवणूक

पुणे : सेकंड शॉदी डॉट कॉम या विवाह विषयक संकेत स्थळावरून झालेल्या ओखळीत एका ठगाने शिक्षिकेची १७ लाख ५७ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. ठगाने वाढदिवसाच्या दिवशी गिफ्ट पाठविण्याच्या बहाण्याने हे पैसे उकळले आहेत.

याप्रकरणी एका ५५ वर्षीय क्रीडा शिक्षिकेने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सायबर ठगाच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हि घटना १० फेब्रुवारी ते २६ मार्च दरम्यान घडली आहे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला वडगाव बुद्रुक येथील एका नामांकीत महाविद्यालयात क्रीडा शिक्षिका म्हणून नोकरी करतात. त्यांचा आरोपी सोबत सेकंड शादी डॉट कॉम या विवाह विषयक संकेतस्थाळावरून परिचय झाला होता. आरोपीने महिलेला लग्न करणार असल्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात खेचून विश्वास संपादन केला. तसेच इंग्लंड येथे चारचाकी वाहन घेणार आहे व स्वतःचे रुग्णालय उभारत असल्याचे सांगितले.

फिर्यादींच्या कुटुंबीयांबद्दल माहिती घेतल्यानंतर वाढदिवसानिमित्त भेटवस्तू पाठविल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या मोबाईलवरून फोन करून कस्टम



विभागातून बोलत असल्याची बतावणी करत भेटवस्तूसाठी फी भरावी लागणार असल्याचे सांगितले. या बहाण्याने १७ लाख ५७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, फिर्याद महिला आरोपीच्या प्रलोभनला बळी पडली. तिने तो सांगेल तसे पैसे हवाली केले. परंतू काही कालावधीनतंर महिलेला आपली फसवणूक झाल्याचे समजले. त्यानुसार तिने याबाबत पोलिसात तक्रार दिली.

## पुण्यातील कात्रज घाटात भीषण अपघात, बसच्या धडकेत रिक्षाचा चेंदामेंदा ; १ ठार ३ गंभीर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात अपघाताची भीषण घटना घडली आहे. पुण्यातील कात्रज घाटामध्ये एसटी बस आणि रिक्षाचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर बाकी तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. एसटी बस साताऱ्याच्या दिशेने जात होती तर रिक्षा पुण्याच्या दिशेने येत असल्याची माहिती मिळत आहे.

रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू, जखमींवर पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु

पुण्यातील कात्रजच्या घाटामध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. रीक्षा .आणि एसटी बसचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर तीन जण जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ उपचारासाठी पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

पिकअपची दुचाकीला जोरादार धडक, एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू

वाशिम जिल्ह्यात भीषण अपघाताची धक्कादायक घटना घडली आहे. वाशिम मंगरुळपीर महामार्गावर पारडी टकमोर गावाजवळ आंबे वाहून नेणाऱ्या पिकअप वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दुचाकीवरील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. पिकअप वाहनाने दुचाकीला धडक दिल्यानं हा अपघात झाला आहे. अपघात इतका भीषण होता की अपघातनंतर पिकअप वाहन रस्त्यालगत असलेल्या शेतात खाली पलटी झाला आहे. पिकअप वाहनात या धडकेत वारा देपुळ गावातील एकाच कुटंबातील तीन जण जागीच ठार झाले आहेत. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गोंदिया जिल्ह्यात भरधाव टिप्परने माय-लेकाला चिरडले, भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

गोंदियाच्या तिरोडा शहरातील सुकडी नाका परिसरात आज सायंकाळी एका भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने मोटारसायकलला मागून जोरदार धडक दिली. ज्यामध्ये माय-लेकाचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. काटी-बिरसोला येथील रहिवासी असलेले चौधरी कुटुंब मोटारसायकलने प्रवास करत असताना सुकडी नाका परिसरात पाठीमागून येणाऱ्या भरधाव टिप्परने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवर स्वार असलेल्या हंसलता चौधरी (वय ३५) आणि त्यांचा ९ वर्षांचा मुलगा तन्मय चौधरी हे दोघेही चिरडले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. मोटारसायकल चालक कामस धर्मदास चौधरी हे या अपघातात जखमी झाले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

अपघात घडल्यानंतर आरोपी टिप्पर चालक आपल्या वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच तिरोडा पोलिसांनी तातडीने धाव घेत मृतदेहांचा पंचनामा केला आणि ते उत्तरीय तपासणीसाठी पाठवले.

## रोहित पवारांचं विधान वैयक्तिक, एकमेकांविरुद्ध लढलो त्याचं दु:ख, आता पवार विरुद्ध पवार लढाई नको – युगेंद्र पवार

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यात होत असलेल्या बारामती पोटनिवडणुकीकडे आज सर्वांचे लक्ष लागले असून सुनेत्रा पवार यांनी भल्या सकाळीच आपला मतदानाचा हक्क बजावत सर्व बारामतीकरांना मतदान करण्याचे आवाहन केले. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर आज पोटनिवडणूक होत असून पवार कुटुंब या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. शरद पवार आज स्वत: मतदानाला उपस्थित नसले तरीही त्यांनी सुनेत्रा पवार यांना मतदान करण्याचं आवाहन बारामतीकरांना केलंय. त्यामुळे, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरुद्ध निवडणुकीच्या मैदानात असलेले पवार कुटुंब या निवडणुकीत एकत्र दिसून आलं. मात्र, २०२९ च्या निवडणुकीची देखील चर्चा या अनुषंगान होत आहे. त्यातच, युगेंद्र पवार यांनी २०२९ च्या निवडणुकीसंदर्भाने मोठं वक्तव्य केलं आहे.

रोहीत पवार यांनी २०२९ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या वक्तव्यावर युगेंद्र पवार यांनी आपली भूमिका मांडली. २०२९ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात, जय विरुद्ध युगेंद्र अशी लढत होऊ शकते असं जे रोहित पवार म्हणाले ते त्यांचं वैयक्तिक मत असू शकतं. यापूर्वी लोकसभेला आणि विधानसभेला पवार विरुद्ध पवार असं एकमेकांविरुद्ध लढलो त्याचं दुःख आहे. पण,



आम्ही कुटुंब म्हणून एकत्र आलेलो आहेत. आता पवार विरुद्ध पवार लढाई नको, तशी आमची इच्छाही नाही, अशा शब्दात शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे युगेंद्र पवार यांनी परखडपणे भूमिका मांडली. जय पवार यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना, २०२९ मध्ये मी विधानसभेचा उमेदवार व्हावे, अशी लोकांची आणि कार्यकर्त्यांची मागणी आहे. पण मला कार्यकर्ता म्हणून काम करायचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यावर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. कार्यकर्ते आणि पक्षाची इच्छा असते, ते ऐकावं लागतं, त्यांचा पक्ष वेगळा आहे. त्यांच्या पक्षाकडून जो कुठला निर्णय घेतला जाईल त्यावेळी सुनेत्रा काकी निवडणुकीला उभं राहणार नसतील तर, जे कोणी उभं राहील, २०२९ ला तसं बघितलं तर सर्वपक्षीय लढाई होऊ शकते. बारामतीत भावनिक दृष्टीकोनातून निर्णय घेत आम्ही सुनेत्रा पवार यांचा प्रचार केला. पण आमचे पक्ष वेगळे आहेत. २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा पवार विरुद्ध पवार लढाई होऊ शकते. जय पवार उमेदवार असतील तर इकडून युगेंद्र पवार उमेदवार असू शकतात, असे रोहित पवार यांनी सांगितले. रोहित पवार यांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी आज सकाळी मतदान केलं, त्यानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, बारामतीत २०२९ ला पवार विरूध्द पवार (झुरुरी तड झुरुरी) अशी निवडणूक होण्याची शक्यता आहे. अजित पवारांचे बंधू श्रीनिवास पवार (ड्हीळपळुरी झुरुरी) यांनी रोहित पवार आणि जय पवार यांच्या वक्तव्यावर भूमिका मांडली. जय पवार आणि रोहित पवार यांच्या वक्तव्यावरती बोलताना श्रीनिवास पाटील म्हणालेत की, दोघांनाही आज या क्षणी बोलायचं नाही गरज नव्हती, आणखी फार लांब जायचं आहे, आज फार महत्त्वाचा दिवस आहे, आपण सगळे पुढे होऊन दादासाठी सगळं करत आहोत, कोणीही विरोधात उभा राहिलेला नाही, आता मला वाटते की त्या गोष्टी बोलायची गरज नव्हती. आता, युगेंद्र पवार यांनीही वडिलांच्या सुरात सूर मिसळत रोहित पवारांचे मत वैयक्तिक असल्याचं म्हटलं.

## तुझ्याशिवाय जगू शकत नाही, आपण लग्न करू' असे सांगून तरुणीवर अत्याचार

चाकण: लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याचा आणि तिचा गर्भपात केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने (वय २४, सध्या रा. वासुली फाटा) महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली आहे.



मुख्य आरोपी कमलेश गाडेकर (वय २६, रा. सवासनी, ता. जफराबाद, जि. जालना) याच्यासह त्याचे वडील गणेश आबा गाडेकर (वय ५०) आणि आई अंबिका गणेश गाडेकर (वय ४५) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

पीडित तरुणीची ओळख कमलेश गाडेकर याच्याशी राहत्या ठिकाणी झाली. ओळख वाढल्यानंतर त्याने तिच्याशी मोबाईलवर व प्रत्यक्ष भेटीत संपर्क ठेवत प्रेमसंबंध प्रस्थापित केले. 'तुझ्याशिवाय जगू शकत नाही, आपण लग्न करू,' असे सांगून त्याने तिचा विश्वास संपादन केला.

त्यानंतर आरोपीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. पुढील काही महिन्यांत त्याने वारंवार तिच्यावर अत्याचार केले.

दरम्यान, तरुणी गर्भवती झाल्याचे लक्षात आल्यानंतर तिने आरोपीकडे लग्नाबाबत विचारणा केली; मात्र, आरोपीने टाळाटाळ सुरू केली. तक्रारीनुसार, आरोपीने तिला दवाखान्यात नेऊन गर्भपातासाठी गोळ्या दिल्या. त्या घेतल्यानंतर तिचा गर्भपात झाला. यानंतरही तिने वारंवार लग्नाची मागणी केली असता आरोपीने नकार दिला आणि नंतर आपल्या आई-वडिलांसह मूळ गावी निघून गेला. यानंतर पीडित तरुणीने आरोपी व त्याच्या आई-वडिलांशी संपर्क साधून लग्नाबाबत विचारणा केली असता, त्यांनी शिवीगाळ करत धमक्या दिल्या आणि 'हे लग्न होणार नाही' असे स्पष्ट सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. या सर्व प्रकारामुळे मानसिक त्रास सहन करावा लागल्याने तरुणीने अखेर पोलिसांकडे धाव घेतली. तिच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## रमाई आंबेडकर स्मारक उभारणीस १९ कोटी ३६ लाख ; स्थायी समितीकडून विविध कामांना मान्यता

पिंपरी: पिंपरी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारकाच्या मागील बाजूच्या मोकळ्या जागेत माता रमाई आंबेडकर स्मारक उभारण्यात येणार आहे. तेथे माता रमाई यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासोबत स्थापत्य व विद्युतविषयक कामे केली जाणार आहेत. त्यासाठी १९ कोटी ३६ लाख खर्चास विविध विकासकामांना स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. या वेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगर सचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समितीचे सदस्य व विभागप्रमुख उपस्थित होते.

माता रमाई आंबेडकर स्मारक उभारण्याच्या कामासाठी स्थापत्य उद्यान व क्रीडा विभागाने २३ कोटी ५४ लाख ९६ हजार खर्चाची निविदा काढली होती. त्यात चार ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यातील तीन निविदा पात्र ठरल्या.

त्यापैकी बी. के. खोसे यांची १८.०७ टक्के कमी दराची १९ कोटी ३६ लाख



खर्चाची निविदा पात्र ठरली आहे. कमी दर असल्याने ठेकेदाराकडून तब्बल २ कोटी ८५ लाख ९० हजार रुपये अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम १८ एप्रिलला जमा करून घेण्यात आली आहे. या खर्चास समितीने आयत्या वेळी मान्यता दिली आहे.

महाालिकेच्या शाळा, रुग्णालय, क्षेत्रीय कार्यालय, नाट्यगृहांचे फायर सेफ्टी ऑडिटनुसार कामे करणे, महापालिकेच्या विविध विभागांसाठी ६५ इंची २० एलईडी टीव्ही खरेदीस १६ लाख ४ हजार रुपये खर्च आहे.

महापालिकेच्या चार शाळांसाठी स्मार्ट किड्स फिटनेस इक्विपमेंट साहित्य चार किटसाठी १६ लाख ६० हजार खर्च करणे, स्वच्छ भारत अभियान व 'माझी वसुंधरा अभियान'अंतर्गत प्रकल्पाचे कामकाज चालवण्यासाठी एजन्सीची निवड करणे, चिंचवड गाव येथील क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालयाच्या स्वच्छतेविषयी कामाकरिता दोन सफाई कर्मचाऱ्यांची ८ महिन्यांसाठी नेमणुकीस ४ लाख २६ हजार खर्च आहे.

पुणे-बंगळुरू महामार्गाच्या पूर्वेकडील वाकड-पुनावळे-ताथवडे व प्रभागातील इतर परिसरातील नव्याने ताब्यात येणारे रस्ते विकसित करण्यासाठी २६ लाख ४२ हजार खर्च करणे, मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करून घेण्यासाठी संस्थेची नेमणूक करणे आदी खर्चास समितीने मान्यता दिली आहे.

जाणता राजा' महानाट्यासाठी २७ लाख ८४ हजार खर्चास मंजुरी

महाराष्ट्र दिनी १ मे रोजी महापालिकेकडून लेखक बाबासाहेब पुरंदरे लिखित 'जाणता राजा' हे महानाट्य शहरात घेण्याची शिफारस महापौर रवी लांडगे यांनी केली आहे. त्यानुसार, त्या महानाट्यातील कलाकारांचे मानधन, मंडप, स्टेज, साउंड सिस्टीम, घोडे, बैलगाडी, प्रसिद्धी यावर २७ लाख ८४ हजार रुपये खर्च केला जाणार आहे. त्या खर्चास स्थायी समितीने ऐनवेळी मान्यता दिली आहे. पूर्णानगर, चिंचवड येथील अटल बिहारी वाजपेयी उद्यानाचे दुसऱ्या टप्प्यातील काम करण्यात येणार आहे. त्यासाठी सचिन शहा यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.